❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २४३ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये
www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

# दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

# सर्वांना विश्वासात घेऊनच विकास आराखडा निश्चित करणार



■ मुंबई (दै. संध्या)

पंढरपूरच्या विकास आराखड्यात वारकरी, भाविक, स्थानिक नागरिक, व्यापारी, मठाधिपती तसेच लोकप्रतिनिधींच्या सूचना आणि मागण्यांचा समावेश करून सर्वांना विश्वासात घेतच आराखडा अंतिम करण्यात येईल. पंढरपूरचा विकास हा पुढील ५० वर्षांचा विचार करून भाविकांच्या सोयी-सुविधांसह स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देण्याच्या उद्देशाने केला जात आहे, दरवर्षी पंढरपूरला येणाऱ्या भाविकांची संख्या वाढत असल्याने संपूर्ण शहराचा एकात्मिक आणि दीर्घकालीन विचार करून नियोजन करणे आवश्यक असल्याचे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. सह्याद्री अतिथीगृह येथे पंढरपूर तिर्थक्षेत्र विकास आराखडा बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान आवताडे, जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नागपूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सोलापूरचे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, पंढरपूरचे उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, पंढरपूर मंदिर समितीचे उपजिल्हाधिकारी तथा व्यवस्थापक राजेंद्र शेळके, सोलापूरचे उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, सोलापूरचे विधी अधिकारी राजेश अंदाने, पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे, पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीचे वीर रामकृष्ण महाराज, अभयराजे इंचगांवकर कुलकर्णी, व्यंकटेश नारायण कुलकर्णी, मुकुंद बडवे, वैभव बडवे, गणेश लंके, डॉ. प्राजक्ता बेणारे, चैतन्य बारसोडे, दर्शन महाजन बडवे, मनोजकुमार रामकिसन राठी आणि संजय आवताडे यासह इतर अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पंढरपूरमध्ये भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता भविष्यातील गर्दीचे व्यवस्थापन अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने करणे आवश्यक आहे. त्यासाठी पारंपरिक पद्धतींबरोबरच आधुनिक तंत्रज्ञान आणि विविध डिजिटल टूल्सचा वापर करण्यात येईल. भाविकांना सुरक्षित, सुलभ आणि सुरळीत दर्शन व प्रवासाची सुविधा मिळावी, यासाठी एकात्मिक नियोजनावर भर दिला जाईल. हा विकास आराखडा केवळ शासनाला काहीतरी करायचे आहे म्हणून लादला जाणार नाही. पंढरपूरचे नागरिक आणि येथे येणारे लाखो भाविक यांच्या हिताचा विचार करूनच तो तयार केला जात आहे. स्थानिक नागरिक, आर्किटेक्ट्स आणि लोकप्रतिनिधींनी मांडलेल्या सूचनांचा विचार करून आणि त्यातील शक्य त्या सर्व चांगल्या बाबी आराखड्यात समाविष्ट कराव्यात, असे निर्देश त्यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, धार्मिक स्थळांचा नियोजनबद्ध विकास झाल्यास भाविकांची संख्या वाढते आणि त्याचा थेट सकारात्मक परिणाम स्थानिक अर्थव्यवस्थेवर होतो.

### मंदिर-मठांना सुरक्षित ठेवून विकास

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पंढरपूरमधील जुनी मंदिरे आणि मठ यांचे धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन त्यांना आहे त्याच ठिकाणी ठेवून त्यांचा विकास केला जाईल. कोणतेही मंदिर किंवा मठ स्थलांतरित केले जाणार नाही. बाधितांचे योग्य पुनर्वसन करून 'जागेस जागा' देण्याचे शासनाचे धोरण आहे.विकास आराखड्यामुळे बाधित होणारे दुकानदार, रहिवासी आणि इतर व्यावसायिक यांच्या पुनर्वसनाला शासनाचे सर्वोच्च प्राधान्य राहील. पूर्वीच्या अनुभवांमुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेला अविश्वास दूर करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. बाधित दुकानदारांना पर्यायी दुकाने, तर बाधित होणाऱ्या ५०० हून अधिक घरांतील नागरिकांना योग्य पर्याय उपलब्ध करून देत नियोजन केले आहे. पंढरपूरमधील जमीन व मालमत्ता अधिग्रहणासाठी देण्यात येणारा मोबदला हा थेट मुंबईतील दरांच्या धर्तीवर देण्यात आला आहे. संपूर्ण भारतात एवढा मोठा मोबदला अन्यत्र दिला गेला नसावा, असेही ते म्हणाले.

# ग्रामस्थांचे नुकसान टाळून मार्ग काढणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ मुंबई (दै. संध्या)

केंद्र सरकारच्या माध्यमातून उभारण्यात येत असलेल्या नवीकरणीय ऊर्जेच्या ग्रीन कॉरिडॉरमधील भोर तालुक्यातून जाणाऱ्या ट्रान्समिशन लाइन व भोंगवली येथील प्रस्तावित जीआयएस सबस्टेशन उभारताना स्थानिकांच्या अडचणी समजून घेत स्थानिक नागरिकांचे कमीत कमी नुकसान होईल, असा सकारात्मक मार्ग काढला जाईल, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महापारेषणच्या अधिकाऱ्यांना दिले. भोंगवली येथील प्रस्तावित जीआयएस सबस्टेशनबाबत सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यावेळी श्री. फडणवीस बोलत होते. सबस्टेशनची जागा, विद्युत वाहिन्यांचे संरेखन आणि भविष्यातील वाढीव विद्युत भार यांचा विचार करून व्यवहार्य पर्याय तपासण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.



मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, भोरमधील शेतकऱ्यांची विविध प्रकल्पांसाठी यापूर्वीच जमीन गेलेली असताना पुन्हा या प्रकल्पासाठी जमीन मागितली जात असल्याचे स्थानिक समितीचे म्हणणे आहे. याबाबत स्थानिकांशी चर्चा करण्यात आली आहे. या प्रकल्पाचे जवळपास ४० टक्के काम पूर्ण झाले आहे. पुण्यासारख्या औद्योगिक जिल्ह्यात विजेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे आवश्यक सबस्टेशन्स उभारली नाहीत तर भविष्यात मोठ्या प्रमाणावर वीजटंचाई निर्माण होऊ शकते. पुणे जिल्ह्यातील विविध इतर तालुक्यांमध्येही सबस्टेशन्सची कामे सुरू आहेत. मात्र, भोरमधील नागरिकांच्या अडचणी शासनाने समजून घेतल्या असून, त्या सोडविण्यासाठी मार्ग काढला जाईल. या समस्येवर महापारेषण तसेच केंद्र सरकारचे अधिकारी यांच्यासोबत चर्चा करण्यात येणार असून केंद्र सरकारच्या अखत्यारीतील हा प्रकल्प असल्याने संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन पुढील निर्णय घेण्यात येईल. सबस्टेशनच्या कामामुळे स्थानिकांचे कमीत कमी नुकसान कसे होईल, उपलब्ध जागेचा योग्य वापर कसा करता येईल आणि भविष्यातील विद्युत वाहिन्यांबाबत नागरिकांच्या शंकांचे निरसन कसे करता येईल, याचा विचार केला जाईल. ग्रीन कॉरिडॉरला विरोध केल्यास त्याचा परिणाम पुण्याच्या विकासावर होऊ शकतो. त्यामुळे स्थानिकांनीही सहकार्य करावे आणि सर्वांच्या हिताचा मध्यममार्ग काढण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

### संध्या प्रहार




## थोडक्यात...

### नेपाळमध्ये आणखी एका पुराचा इशारा

**काठमांडू : दैनिक संध्या**

नेपाळमध्ये बुधवारी आलेल्या विनाशकारी पुराच्या पार्श्वभूमीवर, चीनने भोटेकोशी नदीत पुन्हा एकदा मोठ्या पुराचा इशारा दिला आहे. चीनकडून मिळालेल्या माहितीनुसार, रसुवागढी सीमेपासून सुमारे १८ किलोमीटर वरच्या बाजूस ल्हेंडे नदीत पाणी साचल्यामुळे एक तलाव तयार झाला आहे. प्रशासनाने सखल भागातील लोकांना नदी किनाऱ्यापासून दूर जाण्याचा सल्ला दिला आहे. जर हा तलाव फुटला, तर भोटेकोशी नदीला पुन्हा एकदा भीषण पूर येऊ शकतो. गुरुवारी सायंकाळी ५ वाजेपर्यंतच्या नेपाळ पोलिसांच्या आकडेवारीनुसार, बुधवारच्या पुरात ३५९ लोकांचा मृत्यू झाला आहे. आठ जिल्ह्यांमधून मृतदेह सापडले असून, सर्वाधिक १३२ मृतदेह चितवन जिल्ह्यात आढळले आहेत. पुरामुळे सुमारे १,५०० लोक बेपत्ता असून, त्यात २८८ भारतीयांचा समावेश आहे. २१ भारतीयांना वाचवण्यात आले असून, त्यापैकी ११ जणांची ओळख पटली आहे.

### रिक्षा चालकांना एका वर्षाची मुदतवाढ

**मुंबई : दैनिक संध्या**

अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी शिकण्याच्या मुद्द्यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक मोठी घोषणा केली आहे. अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी शिकण्यासाठी एका वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. या दरम्यान, त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात येणार नसल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. आतापर्यंत मराठी बोलता येत नसलेल्या रिक्षाचालकांवर त्यांचा परवाना रद्द करण्याची कारवाई करण्यात येत होती. मुख्यमंत्र्यांनी केलेल्या नव्या घोषणेमुळे या रिक्षाचालकांना अभय मिळण्याची शक्यता आहे. अमराठी रिक्षा चालकांच्या एका समितीने मुख्यमंत्र्यांची भेट घेतली आणि मराठी शिकण्यासाठी मुदतवाढ देण्याची मागणी केली. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी हा निर्णय घेतला.

# नेपाळच्या महापुरात महाराष्ट्रातील पर्यटकांची चिंता वाढली

■ मुंबई (दै. संध्या)

नेपाळ-तिबेट सीमेवर आलेल्या भीषण महापुरामुळे मोठी जीवितहानी झाली असून, कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेलेल्या भारतीय पर्यटकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारनेही आपली यंत्रणा सतर्क केली आहे. महाराष्ट्रातून नेपाळला गेलेल्या सुमारे 80 पर्यटकांची माहिती राज्य सरकारकडे आली असून, त्यापैकी आतापर्यंत केवळ चार जणांशी संपर्क होऊ शकला आहे, अशी माहिती राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. महत्त्वाचे म्हणजे, महाराष्ट्रातील नेपाळमध्ये अडकलेल्या नागरिकांची संख्या याबाबत सुरुवातीला वेगवेगळे आकडे समोर येत आहेत. राज्य आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेने सध्या 80 पर्यटकांचा मागोवा घेण्याचे काम सुरू केले आहे. त्यापैकी चार जण सुरक्षित असल्याची खात्री झाली असून, उर्वरित पर्यटकांशी संपर्क साधण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे नागरिकांनी आपल्या नातेवाईकांची किंवा परिचितांची माहिती प्रशासनाला देण्याचे आवाहन गिरीश महाजन यांनी केले आहे. नेपाळमधील परिस्थितीबाबत पत्रकारांशी संवाद साधताना गिरीश महाजन यांनी सांगितले की, रिचा टूर्स अँड ट्रॅव्हल्सच्या दोन वाहनांमधून महाराष्ट्रातील पर्यटकांसह सुमारे 80 जण मानसरोवरच्या दिशेने गेले होते. यापैकी आतापर्यंत चार जणांशी संपर्क झाला आहे. हे चार जण सुरक्षित असल्याची माहिती मिळाली आहे. मात्र, या गटातील इतर नागरिकांची नेमकी स्थिती अद्याप स्पष्ट झालेली नाही. या वाहनांमध्ये महाराष्ट्राबरोबरच आंध्र प्रदेश आणि दक्षिण भारतातील अन्य राज्यांतील नागरिकही असल्याचे महाजन यांनी सांगितले. त्यामुळे या 80 जणांपैकी नेमके किती जण महाराष्ट्रातील आहेत, याचीही पडताळणी सुरू आहे.

■ ८० जण गेले, फक्त चौघांशीच संपर्क, गिरीश महाजनांचे आवाहन

■ 'नातेवाईकांची माहिती तातडीने द्या'



# 'राज्यातील बहुतांश मराठा नेत्यांकडे ओबीसी प्रमाणपत्रे'

■ मुंबई (दै. संध्या)

मराठा आरक्षणाच्या वादादरम्यान काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केलेल्या एका विधानामुळे महाविकास आघाडीत नवा राजकीय वाद पेटला. "राज्यातील बहुतांश मराठा नेत्यांनी ओबीसी प्रमाणपत्रे घेतली असून सुप्रिया सुळे यांच्याकडेही ओबीसी दाखला आहे," असा खळबळजनक दावा वडेट्टीवार यांनी केला होता. या आरोपांवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी अत्यंत तीव्र शब्दांत प्रतिक्रिया देत सर्व आरोप फेटाळून लावले. "महाराष्ट्र काँग्रेस रोज उठून मलाच का टार्गेट करत आहे?" असा थेट सवाल करत त्यांनी यावर तीव्र नाराजी आणि दुःख व्यक्त केले होते. यावर आता विजय वडेट्टीवार यांनी जाहीर खेद व्यक्त केला आहे. एक्स पोस्टच्या माध्यमातून त्यांनी याबाबत आपली भूमिका मांडली.

वडेट्टीवार आपल्या पोस्टमध्ये म्हणाले की, ओबीसी प्रमाणपत्राच्या संदर्भात माझी भूमिका मांडताना खासदार सुप्रिया सुळे यांच्या नावाचा अनावधानाने उल्लेख झाला. त्यामागे त्यांच्यावर कोणताही आरोप करण्याचा माझा हेतू नव्हता. अनावधानाने त्यांच्या नावाचा उल्लेख झाल्याबद्दल खेद व्यक्त करतो. मात्र, याचा अर्थ ओबीसी प्रमाणपत्र घेणाऱ्या मराठा नेत्यांबाबत माझी भूमिका बदललेली नाही. एकीकडे ओबीसी प्रमाणपत्र घेऊन सत्तेचा लाभ घ्यायचा आणि दुसरीकडे ओबीसी समाजाच्या हक्कांवर आघात करायचा, ओबीसींच्या पाठीत खंजीर खुपसायचा, या भूमिकेचे मी कधीही समर्थन करणार नाही. माझा संघर्ष कोणत्याही व्यक्तीविरोधात नसून ओबीसी समाजाच्या हक्कांच्या संरक्षणासाठी आणि सामाजिक न्यायासाठी आहे!" दुसरीकडे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) औषध निरीक्षक, गट-ब परीक्षेतील पेपरफुटीच्या प्रकरणावरून राजकीय आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी या प्रकरणावरून राज्य सरकार आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. केवळ एका 'लव्ह स्टोरी'मुळे पेपरफुटी झाल्याचे सांगून हे प्रकरण संपवता येणार नाही, असा दावा करत एमपीएससीमध्ये मोठ्या प्रमाणात गोंधळ सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. सत्ताधारी पक्षाकडून एमपीएससीच्या वर्ग-१ आणि वर्ग-२ पदांच्या भरती प्रक्रियेत हस्तक्षेप केला जात असल्याचा गंभीर आरोपही वडेट्टीवार यांनी केला. आयोगाला पुरेसा कर्मचारी वर्ग देण्याची, आयोगाच्या अध्यक्ष आणि सदस्यांची पार्श्वभूमी तपासण्याची आणि परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्याची मागणी त्यांनी केली. वडेट्टीवार यांनी पत्रकार परिषदेत एमपीएससीच्या औषध निरीक्षक परीक्षेतील पेपरफुटीबरोबरच राज्य उत्पादन शुल्क विभागातील परीक्षा गैरप्रकार, बनावट पदव्या, आदिवासी विद्यार्थ्यांचे प्रश्न, ओबीसी प्रमाणपत्रांचा मुद्दा आणि आरटीओमधील कथित गैरव्यवहार अशा विविध विषयांवर सरकारवर निशाणा साधला. औषध निरीक्षक परीक्षेतील पेपरफुटीच्या तपासात प्रेमसंबंधातून एका उमेदवाराला प्रश्नपत्रिका मिळाल्याचा प्राथमिक तपास समोर आला आहे. या पार्श्वभूमीवर वडेट्टीवार यांनी या प्रकरणाकडे केवळ एका घटनेपुरते पाहू नये, असे म्हटले. "केवळ लव्ह स्टोरीमुळे किंवा एका घटनेमुळे हा प्रकार घडला असेल, तरी एमपीएससीच्या परीक्षांमध्ये मोठा सावळागोंधळ आहे," असा दावा त्यांनी केला. या गोंधळाचा फायदा सत्ताधारी पक्षातील काही लोक घेत असल्याचे आरोप करत, भविष्यात यासंदर्भात आपल्याकडे पुरावे आल्यास आपण आणखी बोलणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



विजय वडेट्टीवार

# खाऊन-पिऊन आंदोलन करा

*नरहरी झिरवळांचा आंदोलक विद्यार्थ्यांना सल्ला : १४ दिवसांपासून उपोषण सुरू; लेखी आश्वासनावर विद्यार्थी ठाम*

■ पुणे (दै. संध्या)

पुण्यातील मांजरी परिसरात विविध मागण्यांसाठी आदिवासी विद्यार्थ्यांचे आंदोलन आणि उपोषण गेल्या 14 दिवसांपासून सुरू आहे. आपल्या 14 प्रमुख मागण्यांसाठी विद्यार्थी आंदोलन करत असून, काही विद्यार्थी आमरण उपोषणाला बसले आहेत. मागण्या मान्य झाल्याचे लेखी आश्वासन मिळेपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याची भूमिका विद्यार्थ्यांनी घेतली आहे. दरम्यान, आंदोलनस्थळी भेट देताना विधानसभेचे उपाध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे नेते नरहरी झिरवळ यांनी केलेल्या वक्तव्याची सध्या चर्चा सुरू आहे.

राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके आणि नरहरी झिरवळ यांनी आंदोलनस्थळी जाऊन विद्यार्थ्यांशी चर्चा केली. यावेळी दोन्ही मंत्र्यांनी विद्यार्थ्यांना आमरण उपोषण सोडण्याची विनंती केली. मात्र, विद्यार्थ्यांनी आपल्या मागण्यांबाबत लेखी शासन निर्णय (जीआर) किंवा ठोस लेखी आश्वासन मिळाल्याशिवाय आंदोलन मागे घेण्यास स्पष्ट नकार दिला.

मंत्री अशोक उईके आणि नरहरी झिरवळ आंदोलनस्थळी विद्यार्थ्यांची भेट घेण्यासाठी आले असताना त्यांच्यात संवाद झाला. यावेळी झिरवळ यांनी विद्यार्थ्यांना 'खाऊन-पिऊन आंदोलन करा' असा सल्ला दिल्याचे समोर आले. झिरवळ यांचे हे वक्तव्य ऐकल्यानंतर आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांनीही त्यांना प्रत्युत्तर दिले.

'खाऊन-पिऊन आंदोलन करायचं असतं तर तुम्ही इथे आलेच नसते,' अशी प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी दिली. या संवादामुळे आंदोलनस्थळी काही काळ वातावरण हलकेफुलके झाले. मात्र, झिरवळ यांच्या वक्तव्यावर काही विद्यार्थ्यांनी नाराजी व्यक्त केली. आदिवासी विद्यार्थ्यांच्या 14 प्रमुख मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी विद्यार्थी प्रतिनिधींच्या शिष्टमंडळासोबत तब्बल पाच तास बैठक घेतली. बैठकीनंतर सरकार आणि विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक चर्चा झाल्याचे मंत्री उईके यांनी सांगितले. मात्र, काही मागण्यांबाबत तांत्रिक बाबी तपासणे आवश्यक असल्याने निर्णय घेण्यासाठी त्यांनी आणखी दोन दिवसांचा वेळ मागितला. सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचे सांगितले जात असले, तरी विद्यार्थी मात्र लेखी आश्वासनावर ठाम आहेत. केवळ तोंडी आश्वासनावर विश्वास ठेवणार नसल्याचे विद्यार्थ्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे चर्चेनंतरही आंदोलन आणि उपोषण सुरूच आहे.

आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, गेल्या 14 दिवसांपासून विद्यार्थी आपल्या मागण्यांसाठी उपोषण करत आहेत. काही विद्यार्थ्यांची प्रकृतीही खालावल्याची माहिती समोर आली आहे.



मंत्री अशोक उईके यांनी सरकार विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक असल्याचे सांगितले आहे. तांत्रिक बाबींचा अभ्यास करून निर्णय घेण्यासाठी दोन दिवसांची मुदत मागण्यात आली आहे. मात्र, सरकारकडून मागण्यांची अंमलबजावणी करण्याबाबत लेखी आश्वासन मिळेपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार विद्यार्थ्यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे आता सरकार दोन दिवसांत कोणता निर्णय घेते आणि विद्यार्थ्यांच्या 14 मागण्यांवर नेमका काय तोडगा निघतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, नरहरी झिरवळ यांच्या 'खाऊन-पिऊन आंदोलन करा' या वक्तव्याचीही राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

अशा परिस्थितीत आंदोलनाबाबत केलेल्या या वक्तव्यामुळे विद्यार्थ्यांच्या गंभीर मागण्यांची आणि त्यांच्या आंदोलनाची थट्टा केली जात असल्याची भावना काही आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनात हजारो विद्यार्थी सहभागी झाले आहेत. शिक्षण, विद्यार्थी सुविधा आणि आदिवासी विकासाशी संबंधित विविध मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू आहे. सलग 14 दिवस आंदोलन सुरू असूनही मागण्यांवर अंतिम निर्णय झालेला नसल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजी आहे.

# दिशा सालियन मृत्यू प्रकरणी खडेबोल

■ मुंबई (दै. संध्या)

दिवंगत सेलिब्रिटी मॅनेजर दिशा सालियन हिच्या मृत्यू प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात याचिकाकर्ते सतीश सालियन यांच्या याचिकेवर सुनावणीदरम्यान न्यायालयाने मुंबई पोलिसांच्या तपासावर अत्यंत गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. एका वडिलांनी आपली मुलगी गमावली आहे या अत्यंत संवेदनशील दृष्टीनेच आम्ही या प्रकरणाकडे पाहत असल्याचे स्पष्ट करत उच्च न्यायालयाने तपासाच्या पद्धतीवर ताशेरे ओढले आहेत. एफआयआर न नोंदवण्यावर आक्षेप: जर कोणी दखलपात्र तक्रार करत असेल, तर पोलिसांनी रीतसर एफआयआर (FIR) नोंदवून तपास करणे गरजेचे होते. प्राथमिक तपास करून गुन्हा निष्पन्न होतो की नाही हे स्पष्ट केले जाऊ शकले असते.

गेले सहा वर्ष तुम्ही तपास करत आहात. मात्र, पोलीस केवळ CrPC 174 (अपघाती मृत्यू ADR) अंतर्गत तपास करत बसले आहेत. अशा तपासाला कायदेशीर मर्यादा असतात आणि त्याअंतर्गत नोंदवण्यात आलेल्या जबाबांना पुरावे म्हणून फारशी किंमत नसते. तपासाच्या उपयुक्ततेवर प्रश्न: तुम्ही आजवर जो तपास केला तो व्यर्थ आहे का? तुम्ही आज त्यांना एप्रिल 2026 चा क्लोजर रिपोर्ट देत आहात, त्याला मुलीचे वडील आजही न्यायालयात आव्हान देऊ शकतात." एफआयआरचा पर्याय उपलब्ध: एफआयआर दाखल करून अधिकृत आणि वैधानिक तपास करण्याचा पर्याय अद्यापही पोलिसांकडे उपलब्ध असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

## संपादकीय

# शिक्षणाच्या दारास नकोत कुलपे

शिक्षणाची दारे सताड उघडी असावीत. त्यातून चुकीच्या गोष्टी घुसू नयेत म्हणून कडीकोंडे असावेत. कठोर नियमांची जाडजूड कुलपे तेवढी नसावीत. ज्ञानाचा प्रकाश सर्वत्र पसरावा म्हणून दिवे लावायचे आणि ते हवेने विझू नयेत म्हणून त्यावर लगेच झाकण ठेवायचे या कृतीचे समर्थन कोण करेल? प्रकाशाच्या अपेक्षेने दिवा लावला जात असेल, तर तो विझू नये याची काळजी, तो लावण्यापूर्वीच घेणे जरूरीचे असते; अन्यथा लावून झाकलेल्या दिव्याचा प्रकाशही पडणार नाही आणि तो विझणारही नाही. नव्या प्रकाशासाठी नियमांचे दिवे लावण्याचा प्रयत्न आदिवासी विभागाने केला आणि त्यावरूनच ठिणगी पडली. वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात सुसूत्रता यावी म्हणून त्यांनी नवी नियमावली आणली. त्याविरोधात विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. प्रारंभी काही अटी मागे घेतल्या. आंदोलन तीव्र झाल्यावर आणखी काही नियम मागे घेतले. नियम मागेच घ्यायचेच होते तर ते लागू का केले? कुणाच्या सल्ल्याने केले? त्यांना विरोध, आंदोलने होतील याचा अंदाज कुणालाच आला नसावा का? या सगळ्या प्रकरणाची सुरुवात झाली ती, आदिवासी विभागाने ५ ऑगस्ट रोजी काढलेल्या एका शासन निर्णयाने. तो सगळाच निर्णय वाईट आहे, असे नाही. त्यातील काही अटी चांगल्या आहेत, काहींवर आक्षेप आहे. २६ वर्षांवरील विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश नसेल, ज्याच्या शिक्षणात खंड पडला त्याला प्रवेश नसेल, एक पदवी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याला दुसऱ्या पदवीसाठी शिक्षण घ्यायचे झाल्यास वसतिगृह मिळणार नाही. खोटी माहिती देणाऱ्याचे प्रवेश रद्द होतील. त्यांनी घेतलेल्या लाभाची रक्कम १२ टक्के व्याजदराने वसूल केली जाईल. या अटींना विरोध सुरू झाला. विद्यार्थ्यांना संघटनेत भाग घेता येणार नाही, अन्नत्याग, आंदोलन करता येणार नाही. संपासाठी प्रवृत्त करता येणार नाही. प्रसारमाध्यमांकडे तक्रारी करता येणार नाही अशा निर्बंधांनी त्यात तेल ओतले. त्यांनी गिरीपेठ परिसरातील आदिवासी भवनापुढे 'अहोरात्र आंदोलन' सुरू केले. हळूहळू ते सगळीकडे पसरले. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी आंदोलनास भेटी दिल्या. मंत्री भेटले. १४ ऑगस्टला काही अटी मागे घेतल्या गेल्या. राज्यातील आदिवासी आमदारांच्या बैठकीनंतर आणखी काही अटी मागे घेण्याची चर्चा सुरू झाली. ज्यांना समाजातील विषमता, गरिबी आणि दुर्गमतेमुळे अनेक अडथळे पार करावे लागतात, त्यांना, '२६ वर्षांनंतर शिक्षण नको', 'शिक्षणात खंड नको ', 'आवाज उठवला तर वसतिगृह धोक्यात' असा संदेश देणे कितपत न्यायाचे समजावे? आदिवासी विद्यार्थ्यांचे आयुष्य शहरातील विद्यार्थ्यांसारखे सरळ रेषेत चालत नाही.असंख्य समस्यांचा विळखा त्यांच्या भोवती पडलेला असू शकतो. यातील कोणतेही कारण त्यांच्या शिक्षणात खंड पाडू शकते. या खंडाने त्यांचे शैक्षणिक आयुष्य खंडित होऊ नये. नियमावलीतील सगळ्याच अटी आक्षेपार्ह नाहीत. वसतिगृहात नशापाणी नको, मद्यपान-धूम्रपान नको, मारामाऱ्या नको, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या विद्यार्थ्यांची यादी असावी आदींचाही त्यात समावेश आहे. त्याला कुणाचा विरोध असण्याचे कारण नाही. काही क्षेत्रात शिस्त असणे आवश्यक असते. शासन निर्णय म्हणजे पांढऱ्या कागदावरील काळी अक्षरे नव्हेत. त्याच्या प्रत्येक ओळीतील प्रत्येक शब्द हजारो लोकांचे आयुष्य घडवू किंवा बिघडवू शकतो. सध्या राज्यात ४९० शासकीय आदिवासी वसतिगृहे कार्यरत आहेत. त्यात सुमारे ६० हजार विद्यार्थी शिकतात.

नियमावलीतील चुकीचे शब्द त्यांच्या शैक्षणिक आयुष्यासाठी घातक ठरू शकतात. त्यामुळे लिहितानाच हजार वेळा विचार करावा. उन्हाळ्यातील गोष्ट. नागपुरात ४६ अंश सेल्सिअस तापमानात होते. वसतिगृहात कूलर नव्हते. विद्यार्थ्यांच्या एका फोनवर मुख्यमंत्र्यांनी तासाभरात कूलर लावण्याचे आदेश दिले. मुख्यमंत्र्यांची ही संवेदनशीलता प्रशासन आत्मसात करील तेव्हा नियमावलींची आणि आंदोलनाची कशाला गरज भासेल!

## संस्कृत सुभाषित

अर्थातुराणां न गुरुर्न बंधुः कामातुराणां न भयं न लज्जा ।
चिन्तातुराणां न सुखं न निद्रा क्षुधातुराणां न बलं न तेजः ।।

अर्थ : द्रव्यासाठी आतुर झालेला माणूस गुरू किंवा भावाला जाणत नाही, कामवासनेने उद्दीपित झालेल्या माणसाला भीती किंवा लज्जाही नसते. चिंतातुराला सुख नसते किंवा निद्राही नसते. भुकेने ग्रासलेल्या माणसाला बल किंवा तेज नसते.

## गुरु वचन

### दुसऱ्याच्या दु:खात सहभागी

वाणी, तन, मन, वचन आणि धन जी कोणतीही शक्ती आपल्याजवळ असो. तिच्याद्वारे आपण कुणाचे दु:ख तीळमात्रही कमी केले किंवा त्याच्या दु:खात आपण सहभागी झालो तर ही सर्वात मोठी इश्वर सेवा होय. मानवाच्या प्रवृत्तीत स्वाभाविकरित्या आपल्या सुख-सुविधा पाहण्याचा स्वार्थ निर्माण होतो. उपदेश देणाराही प्रकारान्तर आपल्याला समोर ठेवतो आणि म्हणतो तुम्ही भक्तांचा सन्मान करा. परमेश्वरही आपल्या भक्तांचा सन्मान करतो. व्यक्ती अर्थात आपण भक्त आहोत आणि तुम्ही आमचा सन्मान करा. आपली चर्चा करण्याची पद्धत वेगवेगळी असते. म्हणतात की, ज्ञानप्राप्तीनंतर काहीही करायला नाही पाहिजे. शेवटी तुम्ही समजलात आपण काहीही करु शकत नाहीत तर आपल्या परमेश्वराचे प्रेम मिळाल्यावर कोणी त्याचा निषेध करत नाही तर तुम्ही समजून घ्या की, आपण प्रेमी आहोत. परमेश्वराचे प्रेमी आहोत. हे छळाचे जीवन आहे आणि छळपूर्ण जीवनात दुसऱ्यांचा छळ करणे गुन्हा आहे. निर्णय परमेश्वरच घेतो. परंतु एवढा विश्वासू मात्र आवश्यक आहे की तो प्रेमळ आहे. आपल्याला गुन्ह्याला कमी समजणे हे त्याचे प्रेम आहे. परंतु आपण त्याच्या प्रेमाचा दुरुपयोग करायला नाही पाहिजे. त्याच्या प्रेमावरुन आपण स्वत:ला जनतेसमोर अशाप्रकारे सादर करा की, ते भ्रमात येतील हे स्वत:ला भ्रमात ठेवण्यासारखे आहे. ही गोष्ट मनुष्याने सदैव लक्षात ठेवली पाहिजे की, त्याला आपले भले करायचे असेल तर कुणाचयाही ऐकण्या-बोलण्याने वा कोणत्याही प्रकारच्या वाक्य संयोगाने स्वत:ला जिंकणे आहे. यापेक्षा अधिक ऐकले नाही तर मोठा धोका ठरेल. त्याच्या प्रगतीचे सर्व मार्ग खुंटले जातील आणि कष्ट करण्याची वेळ येऊ लागेल.

## उपदेशकथा

### सुख

काही प्राणीकथा आपल्याला खूप मोठा बोध करून जातात. फक्त तो समजण्याची दृष्टी हवी, नजर हवी. रावसाहेब असेच गच्चीत बसलेले असतानाची गोष्ट. त्यांच्या समोरील भिंतीवर एक मधाचे भांडे ठेवलेले होते. कुठून कोण जाणे पण त्या मधाच्या वासाने तिथे गांधीलमाशा येऊ लागल्या. भांड्याच्या काठावर बसून त्या मधाचा आस्वाद घेऊ लागल्या. रावसाहेबांनी प्रथम त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं पण त्या जसजशा वाढू लागल्या तसतशी त्यांची दखल घेणे त्यांना आवश्यक वाटले म्हणून ते भांड्याजवळ गेले. त्या माशांना उडवून लावू लागले पण त्या उडेनात. त्यांनी बारकाईनं पाहिलं तेव्हा त्यांना दिसलं की, त्या माशांचे पंख मधाच्या भाड्याला चिकटून बसले आहेत. मध खाताना हा धोका माशांच्या लक्षातच आला नव्हता. मध खाण्याच्या सुखात त्या गुरफटून गेल्या होत्या आणि आपले पंख गमावून बसल्या.

कथा उपदेश : भौतिक सुखात असा एकदा का माणूस गुरफटला की, त्याचेही पंख कापले जातात. मानसिक शांतीला पारखा होतो. एका अर्थाने सुखोपभोगाने तो अपंग होतो.

## पंचांग

पंचांग
२८ ऑगस्ट २०२६
शुक्रवार
विक्रम संवत्- २०८२
श्रावण शके
संवत्- १९४८
संवत्सर - पराभवनाम
अयन- दक्षिणयन
मास- श्रावण
ऋतु- सौर शरद
शुक्ल पक्ष
तिथि:पूर्णिमा ०९:४८:१७
नक्षत्र:शतभिषा
२७:१२:५४+
योग:अतिगण्ड ०७:२७:०८
करण:बव ०९:४८:१७
करण:बालव २१:५६:२६
सूर्य:सिंह
चन्द्र:कुम्भ
हिजरी सन् - १४४८
मुस्लिम मास - रबिलावल
तारीख - १४
विशेष
रक्षाबंधन
जरा - जिवंतिका पूजन
खंडग्रास चंद्रग्रहण
(भारतातून दिसणार नासल्यामुळे वेधदि नियम पाळू नयेत.)
हयग्रीवोत्पत्ति
तैत्तिरीय श्रावणी
वरदलक्ष्मी व्रत

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०५२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 2 | | | | | 1 | | |
| | 5 | | | 9 | 3 | | 2 | |
| 7 | | 3 | | 1 | 2 | | 9 | 8 |
| | | 5 | 1 | 3 | | | | |
| 3 | | | | 7 | | | | 1 |
| | | | | 2 | 6 | 9 | | |
| 5 | 3 | | 2 | 4 | | 8 | | 9 |
| | 1 | | 3 | 6 | | | 4 | |
| | | 2 | | | | | 6 | 5 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १०५१ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 4 | 8 | 1 | 5 | 7 | 9 | 3 | 6 |
| 1 | 5 | 7 | 6 | 9 | 3 | 4 | 2 | 8 |
| 3 | 6 | 9 | 8 | 4 | 2 | 1 | 5 | 7 |
| 7 | 3 | 5 | 2 | 8 | 9 | 6 | 4 | 1 |
| 4 | 8 | 1 | 7 | 6 | 5 | 2 | 9 | 3 |
| 9 | 2 | 6 | 3 | 1 | 4 | 8 | 7 | 5 |
| 5 | 1 | 4 | 9 | 7 | 8 | 3 | 6 | 2 |
| 8 | 9 | 2 | 5 | 3 | 6 | 7 | 1 | 4 |
| 6 | 7 | 3 | 4 | 2 | 1 | 5 | 8 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९१६ – दुसऱ्या जागतिक युद्धादरम्यान इटलीने जर्मनीविरुद्ध युद्धाची घोषणा केली.
- १९७३ – मेक्सिकोमध्ये ६.८ रिश्टर तिव्रतेचा भूकंप; ५२७ ठार.
- १९८८ – जर्मनीत एअर शो दरम्यान ३ इटालीयन फायटर विमानाचा धडकेत ७० ठार.
- १९९० – इराकने कुवेतला आपला १९वे प्रांत घोषित केले.
- २००६ – अमेरिकेत 'इरनेस्टो' नावाचे समुद्री वादळ फ्लोरिडा कीसकडे सरकल्याने फ्लोरिडात आणीबाणीची स्थिती घोषित करण्यात आली.

### राष्ट्रीय

- २००६ – भारताने दहाव्या दक्षिण आशिया क्रीडा स्पर्धेत सर्वाधिक पदके जिंकून स्पर्धेची ट्रॉफी जिंकली.

### जन्म

- १०२५ – गो-राइझाइ, जपानी सम्राट.
- १५८२ – तैचांग, जपानी सम्राट.
- १७४९ – योहान वोल्फगांग फॉन ग्यॉटे, जर्मन साहित्यिक.
- १८९६ – फिराक गोरखपुरी, उर्दू कवी.
- १९०५ – सिरिल वॉल्टर्स, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १९१३ – लिंडे हॅसेट, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
- १९२८ – एम. जी. के. मेनन, भारतीय पदार्थवैज्ञानिक.
- १९३८ – पॉल मार्टिन, कॅनडाचा पंतप्रधान.
- १९५७ – डॅनियेल स्टर्न, अमेरिकन अभिनेता.
- १९८३ – लसित मलिंगा, श्रीलंकेचा क्रिकेट खेळाडू.

### निधन

- १३४१ – लिओ पाचवा, आर्मेनियाचा राजा.
- १४८१ – अफोन्सो पाचवा, पोर्तुगालचा राजा.

## : SMS :

Pappu: Yaar garden me shadi kyu nahi hoti?
Chintu: Kyunki wahan kabootar bole - "Bhai hamari shadi nahi hui, tumhari kaise hone de!"

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३१.५ | २३.३ |
| अहमदनगर | ३१.६ | २२.६ |
| अकोला | ३०.६ | २६ |
| अमरावती | २६.७ | २५.५ |
| बीड | ३४.५ | २६.१ |
| भंडारा | ३२.४ | २६.२ |
| बुलढाणा | ४३.७ | २७.७ |
| चंद्रपूर | ३६.५ | २६.३ |
| चेन्नई | ४०.१ | २९.७ |
| नवी दिल्ली | ४३ | ३३.९ |
| धुळे | ३५.१ | २५.५ |
| गोंदिया | ३३.४ | २६ |
| जळगाव | ३३.१ | २५.२ |
| कोल्हापूर | ३०.५ | २२.७ |
| लातूर | ३१.३ | २३.७ |
| मुंबई | ३४.४ | २७.७ |
| नागपूर | ३१.१ | २६.४ |
| नांदेड | ३४ | २५.४ |
| नंदूरबार | ३२ | २४.४ |
| नाशिक | ३०.८ | २३.३ |
| पुणे | २८.६ | २२ |
| पंढरपूर | ३४ | २३.९ |
| सातारा | ३१.५ | २२.६ |
| सांगली | ३२.८ | २३ |
| सोलापूर | ३४.४ | २४.२ |
| वर्धा | ३२.४ | २६.१ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** महत्वाचे निर्णय घेण्यास व्यवसायातील महत्वाचे करार-मदार करण्यास आजचा दिवस चांगला आहे.

**तुळ :** हाताखालील कर्मचाऱ्यांचे उत्तम सहकार्य लाभेल. काहींची अध्यात्मिक प्रवृत्ती वाढीस लागेल.

**वृषभ :** संततीसौख्य लाभेल. मुलामुलींसंदर्भात एखादी भाग्यकारक घटना घडेल. त्यांचे काही प्रश्न असल्यास ते मार्गी लावाल.

**वृश्चिक :** वाहने सावकाश व जपून चालवावीत. तुमची चीडचीड होणार आहे. आरोग्याच्या थोड्याफार तक्रारी जाणवतील.

**मिथुन :** आर्थिक लाभाचेदृष्टीने एखादी नवी योजना नजरेसमोर येईल. व्यवसायात नवीन कल्पना अंमलात आणू शकाल. दिवस फारसा अनुकूल नाही.

**धनु :** नातेवाईकांशी मतभेदाची शक्यता आहे. मानसिक अस्वास्थता जाणवेल. प्रकृतीकडे लक्ष द्यावयास हवे. प्रवास शक्यतो टाळावेत.

**कर्क :** जिद्दीच्या जोरावर तुम्ही तुमची आजची कामे पार पाडू शकाल. वाहने जपून व सावधानतेने चालवावीत. प्रवास टाळावेत.

**मकर :** नवीन हितसंबंध निर्माण होतील. अपेक्षित गाठीभेटी पडतील. सध्या आपणाला नातेवाईकांचे सहकार्य मिळणार नाही, हे गृहितच धरावयास हवे.


**सिंह :** महत्वाचे निर्णय नकोत. काहींची अध्यात्मिक प्रगती होईल. आज तुम्हाला महत्वाच्या आर्थिक कामांत पत्नीचा सल्ला उपयोगी ठरणार आहे.

**कुंभ :** आज पूर्ण दिवस तुम्ही उत्साहाने व उमेदीने कार्यरत राहणार आहात. आरोग्य उत्तम राहील. व्यवसायात नवीन बाजारपेठ मिळवू शकाल.

**कन्या :** वैवाहिक सौख्य उत्तम लाभेल. मित्रांचे सहकार्य उत्तम लाभेल. अपेक्षित गाठीभेटी पडतील. उत्साह व उमेद वाढेल. प्रवास सुखकर होतील.

**मीन :** नोकरी-व्यवसायात उत्तम महत्वाचे निर्णय घेण्यास तसेच आगामी काळाचे नियोजनास दिवस अनुकूल आहे.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०५२



### आडवे शब्द

१. तात्काळ, जागच्या जागी
५. मान्य, आवडते
८. हल, जमीन उकरण्याचे अवजार
१०. एक सुगंधी वनस्पती
१२. अनुमती, मान्यता
१४. संन्याशांची राहण्याची जागा
१६. थेट, सरळ
१७. गुडघ्यावर पुढे सरकणे
१९. गव्हाचे पीठ
२०. युद्धभूमी
२१. अकस्मात
२३. सहा आसनी रिक्षा
२६. जास्तीत जास्त
२७. ताट
२९. किंमत
३०. हात
३२. गांधारीपुत्र
३३. नाका
३४. चांगल्यासाठी प्रशंसेचा उद्गार
३५. पळून जाणे
३७. हिंदीत शाई
३९. भीतीने होणारा कंप
४१. च्याबद्दल
४३. तरतूद
४५. डोळे
४६. फटाक्यांची माळ
४७. हुक्की, लहर
४९. आणि
५०. वितरण, बटवडा
५१. टक, दृष्टी
५२. एक छोटे चर्मवाद्य
५४. खाल्लास शिष्टपणा, दिल्यास मूल्य
५५. अंदाज, तर्क
५७. हृदय
५८. औषध
६०. धातूचा धागा
६१. मूल
६२. स्तुती करण्याजोगे
६३. बाज विणण्याची कापडी पट्टी
६४. गणपती
६८. गाय
६९. मलीन, मळलेला
७१. पंकज
७४. पुष्पदल
७५. व्याप, अस्ताव्यस्त पडलेल्या वस्तू
७७. मध्यस्थ
७८. चर्चा
७९. नामघोष
८०. नृत्यकलेचे दैवत
८१. शिवशंकराच्या गौर वर्णाचे विशेषण

### उभे शब्द

१. शिव्याशाप
२. जबाबदार, करणारा
३. कोलकाताचे विमानतळ
४. पोपट
६. संपुष्टात येणे
७. होडी
८. विंचवाचा डसण्याचा अवयव
९. रम्य, मनोहर
११. गणिका
१३. मार्गक्रमण
१५. लुटारू, लबाड
१८. सेवक, शिष्य
२०. सारखा
२१. अवस
२२. गोष्टी सांगणे
२४. मोगऱ्याची एक जात
२५. चेष्टा, टिंगल
२६. सारा, टॅक्स
२८. आपला परका असा भेद
३०. विद्या
३१. प्रजा
३५. प्रतिष्ठा, सामाजिक वजन
३६. दृष्टीभेट
३८. स्वत:ला कमी लेखणे
४०. खोकला
४२. निरर्थक बडबड
४४. प्रचंड
४७. दोरीच्या गाठीचा एक प्रकार
४८. मेहरबानी
५३. चंदनाची वने असणारा पुराणकालीन पर्वत
५४. हमाल
५६. वेदना
५९. छोटे वादळ
६०. संगीतातील लकेर
६१. इकडून तिकडे गेले वारे अशी स्थिती!
६४. रडणे
६५. मृत्यदेवता
६६. ही देवता मूल जन्माला आल्यानंतर सहाव्या दिवशी त्याचे नशीब लिहून जाते असे म्हणतात
६७. चिखल
७०. मनाचा ओढा
७२. माकड
७३. विशेष
७४. पाप
७६. लाकडाची एक उत्कृष्ट जात
७८. मला

### जम्बो शब्दकोडे क्र. १०५१ चे उत्तर

आडवे उत्तर १. निराकार ४.कडवा ६. सामर्थ्य १०.रसातल १२.सराईत १३.नवलाई १४.धडक १६.पापभीरू १८.आवाज १९.नस २०.अंबाबाई २२.वाडी २३.अवयव २४.आण २५.हालचाल २६.जड २७.लसणा २९.परागंदा ३०.गराडा ३२.नजर ३५.रथ ३७.रवळनाथ ३९.राजवट ४१.नद ४२.तनय ४३.वर्तमानपत्र ४५.महाराज ४७.सुका ४९.हाट ५०.समरसता ५१.खसखस ५२.शकट ५४.मळ ५५.रपेट ५७.दाखला ५८.पाचारणे ६०.गो ६१.रूप ६२.नफा ६३.कालव ६६.शर ६७.वासा ६८.नफा ६९.भूतदया ७१.अदाकारी ७३.सरपट ७४.पात ७५.तगमग ७६.वारस

उभे उत्तर : १.निषेध २.कारक ३.रसा ४.कलप ५.वासरू ६.साईबाबा ७.मत ८.सावज ९.आईवडील ११.तपस १३.नवा १५.डरावडराव १७.भीषण १८.आई १९.नवल २०.अंतरा २१.बारदान २२.वाचावीर २३.अजगर २४.आणा २८.सनाथ २९.पराजय ३१.डाळ ३३.जनमानस ३४.रदन ३६.थट्टा ३८.नाराज ३९.रान ४०.टवका ४२.तळमळणे ४४.परसदार ४५.महाशय ४६.हाटक ४७.सुतार ४८.कमलाकर ५०.समर ५१.खटपट ५३.टपाल ५६.पेरू ५९.चावनट ६२.वायदा ६३.कासार ६४.अभूत ६५.मदत ६६.शरीर ६७.वास ७०.याग ७१.अग ७२.कावा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



### पुणे ऑन पेडल्स सायकल रॅलीचे आयोजन

पुणे : दैनिक संध्या

संसदीय स्थायी समितीच्या (विज्ञान आणि तंत्रज्ञान, पर्यावरण, वने व हवामान बदल) अध्यक्षा, राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या पुढाकारातून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दर वर्षी "पुणे ऑन पेडल्स" ही सायकल रॅली आयोजित केली जाते. यावर्षी सर्वांच्या सोयीसाठी हा उपक्रम 13 सप्टेंबर 2026 रविवार सकाळी 6.00 वाजता संपन्न होणार आहे. प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी सांगितले की, सायकल वापरण्यास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम गेल्या सहा वर्षांपासून आयोजित केला जात आहे. सायकलचे शहर अशी पुण्याची ओळख आहे. सायकल वापरणे आरोग्यासाठी लाभदायक आहे. यंदाच्या सायकल रॅलीतही सहा हजारांहून अधिक सायकलस्वारांनी सहभागी होतील अशी अपेक्षा आहे. त्या पुढे म्हणाल्या, "ही रॅली केवळ सायकल चालविण्याचा कार्यक्रम नसून सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संवर्धन आणि आरोग्यजागृतीचा संदेश देणारा उपक्रम आहे. नागरिक, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सायकलप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या चळवळीला बळ द्यावे." या कार्यक्रमास अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तरी आपण जास्तीत जास्त संख्येने आपल्या विद्यार्थ्यांना सायकल रॅली व फॅमेली वॉकेथॉन साठी नोंदणी करावयास सांगावे व आपली संख्या कळवावी ही विनंती. सहभागींनी स्वत: ची सायकल व पाण्याची बाटली सोबत घेऊन यावी. सायकल नसणाऱ्या विद्यार्थ्यांना व पालकांना तसेच शिक्षकांना 'चालण्याच्या उपक्रमात' (वॉकेथॉन मध्ये) सहभागी होता येईल. यावेळी काही गरजू मुलामुलींना सायकलचे मोफत वाटप करण्यात करण्यात येणार आहे. रॅलीत सहभागी प्रत्येकाला पदक, प्रमाणपत्र आणि टी-शर्ट देऊन गौरविण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

### एथरने कोनार्कच्या मेटल बॉडीची पहिली झलक दिली, २९ ऑगस्टला होणार लॉन्च

पुणे : दैनिक संध्या

एथर एनर्जीने आपल्या आगामी इलेक्ट्रिक स्कूटर कोनार्कची पहिली झलक दिली आहे. कंपनीच्या नव्या ईएल प्लॅटफॉर्मवर तयार होणाऱ्या या स्कूटरचे अनावरण 29 ऑगस्ट रोजी होणार असून, त्यातील मेटल बॉडी हा एक खास डिझाइन एलिमेंट म्हणून समोर आला आहे. एथरचे सीईओ आणि सहसंस्थापक तरुण मेहता यांनी 'X'वर शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये स्कूटरच्या मेटल बॉडीचा क्लोज-अप दाखवला आहे. "टक टक, कोण?" या कॅप्शनसह दिलेल्या टीझरमध्ये नॉकचा आवाज वापरून मेटल कन्स्ट्रक्शनकडे लक्ष वेधले गेले आहे. कोनार्क हा एथरच्या ईएल प्लॅटफॉर्मवर तयार होणारा पहिला प्रॉडक्शन स्कूटर असेल. एथर कम्युनिटी डे 2026 मध्ये हा प्लॅटफॉर्म सादर करण्यात आला होता. नव्या स्कूटरच्या कुटुंबासाठी हा प्लॅटफॉर्म बेस म्हणून विकसित करण्यात आला आहे, ज्यामुळे एथरला इलेक्ट्रिक टू-व्हीलर मार्केटमध्ये अधिक व्यापक आणि सहज उपलब्ध सेगमेंटमध्ये प्रवेश करता येईल. कोनार्कच्या माध्यमातून एथर आपला उत्पादन पोर्टफोलिओ 450 आणि रिज्ता फॅमिलीपलीकडे विस्तारत आहे. ही स्कूटर कंपनीच्या पुढील प्रॉडक्ट डेव्हलपमेंट फेजचा भाग असून, एथरचा डिझाइन, इंजिनिअरिंग, सॉफ्टवेअर आणि दैनंदिन वापरातील सोयीसुविधा यांचा दृष्टिकोन अधिक व्यापक ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. कोनार्कचे अनावरण 29 ऑगस्ट 2026 रोजी बेंगळुरूमध्ये होणाऱ्या एथर कम्युनिटी डे कार्यक्रमात केले जाणार आहे. या कार्यक्रमात ईएल प्लॅटफॉर्मवरील पहिला प्रॉडक्शन लॉन्च म्हणून त्याची नोंद होईल.

### निवृत्त कर्मचाऱ्यांचे प्रश्न जास्त दिवस प्रलंबित ठेवू नये : प्रकाश जावडेकर

पुणे : दैनिक संध्या




भारतीय मजदूर संघाशी संलग्न असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र रिटायर्ड एम्प्लॉइज ऑर्गनायझेशन ह्या निवृत्त बँक कर्मचारी संघाच्या वतीने पंचाहत्तर वर्षे पूर्ण झालेल्या ऐंशी कर्मचारी,अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला."निवारा" मध्ये संपन्न झालेल्या कार्यक्रमात माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर जे बँक ऑफ महाराष्ट्र चे माजी बँक कर्मचारी आहेत त्यांची ह्या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती.त्यांचाही पंचाहत्तर वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सत्कार ह्यावेळी करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरवातीस संघटनेचे कार्याध्यक्ष भास्कर माणकेश्वर यांनी पाहुण्याचे स्वागत केले व संघटनेच्या विविध सामाजिक प्रकल्पांची माहिती दिली.राजगड तालुक्यातील दुर्गम गुहिनी गाव दत्तक घेतल्याची माहिती तसेच "सामाजिक कृतज्ञता निधी" चे समर्पण आत्तापर्यंत तीन कोटी रुपयांचे झाले असल्याची माहिती दिली.

# यशासाठी कठोर मेहनत, सातत्य आणि संघर्षाला संधींची जोड हवी

## माधुरी मिसाळ यांचे प्रतिपादन; ब्रिक ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचा स्थापना दिवस व पदवी प्रदान समारंभ उत्साहात

■ पुणे (दै. संध्या)




"आयुष्यात कष्ट केल्याशिवाय संधी मिळत नाही. मिळालेली संधी साधण्यासाठी आपली क्षमता सिद्ध करणे आवश्यक आहे. जीवनातील संघर्ष आणि कष्टांना सामोरे जाताना कुटुंब आपल्या पाठीशी उभे असते. त्यामुळे सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची कला आत्मसात करा. समोरच्याला आदर देत देशाच्या प्रगतीत योगदान देण्याचा प्रयत्न करा," असे प्रतिपादन राज्याच्या नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी केले. भविष्यात तरुणपिढीची भूमिका महत्वाची असून, भारताच्या उज्ज्वल भविष्यासाठी तरुण वास्तुरचनाकारांनी योगदान द्यावे, असेही त्यांनी नमूद केले. सतिश मिसाळ एज्युकेशनल फाऊंडेशनच्या ब्रिक ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचा १३ वा स्थापना दिवस आणि पदवी प्रदान समारंभात माधुरी मिसाळ बोलत होत्या. उंड्री येथील महाविद्यालयात आयोजित समारंभावेळी नगरसेविका मानसी देशपांडे, ऑलकार्गो ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष शशीकिरण शेट्टी, अहमदाबाद येथील आर्किटेक्ट स्नेहल शाह, प्राचार्या डॉ. पूर्वा केसकर, उपप्राचार्य आर्कि. मनाली देशमुख, जयदीप चक्रवर्ती, मयुरेश शिरोळकर, स्वप्निल शेठ, व्हीके ग्रुपच्या संचालिका आर्कि. अपूर्वा कुलकर्णी, महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. वैदेही लावंड, डॉ. श्रद्धा मांजरेकर, आर्कि. नलिनी नाईक निंबाळकर यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माधुरी मिसाळ म्हणाल्या, "शिक्षणाच्या क्षेत्रात मोठे परिवर्तन होत आहे. या नव्या बदलांना समजून घेत विद्यार्थ्यांनी आधुनिक कौशल्ये विकसित केली पाहिजेत. आपल्या कार्यातून भारताची जगभरातील प्रतिमा उंचावण्यासाठी योगदान द्यावे. तरुणांना योग्य दिशा दाखविण्याचे कामही आधीच्या पिढीने करावे. पदवी मिळणे हा एक टप्पा आहे. प्रत्यक्ष कामाच्या क्षेत्रात तुम्ही आता पदार्पण करीत असून, आपल्या स्वतःच्या प्रगतीसोबतच आई-वडिलांचे, आपल्या संस्थेचे व गुरुजनांचे नाव उंचावणारी कामगिरी करा. आजची पदवी हा प्रवासाचा शेवट नसून, एका नव्या अध्यायाची सुरुवात आहे. आपल्या ज्ञानाचा आणि कौशल्याचा उपयोग समाजासाठी करत स्वतःची वेगळी ओळख निर्माण करा. " शशीकिरण शेट्टी म्हणाले, "शिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या विकासासाठी झाला पाहिजे. केवळ पदवीपेक्षा शिक्षणाचा प्रत्यक्ष जीवनात आणि उद्योगक्षेत्रात उपयोग करता येणे गरजेचे आहे. माझ्या प्रवासात आलेल्या विविध अनुभवांनी मला सातत्याने शिकण्याची आणि बदलत्या परिस्थितीनुसार स्वतःला घडविण्याची संधी दिली. आज तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जागतिक बदलांमुळे उद्योगक्षेत्र वेगाने बदलत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी उद्योगाच्या गरजा समजून घेत आपली कौशल्ये विकसित करावीत. महत्त्वाकांक्षेबरोबरच सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून देशाच्या शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासात योगदान द्यावे."

## पर्सनल आराम आणि कार्यक्षमतेला दिले पुणे बाजारपेठेने प्राधान्य

■ पुणे (दै. संध्या)

भारताचा पश्चिम विभाग हा भारतातील स्वपरिचयावर आधारीत सौंदर्य बाजारपेठेचा मोठा भाग असून यामध्ये वैयक्तिक आराम, कार्यक्षमता आणि ग्राहकांच्या रोजच्या निवडींचा समावेश आहे. फ्लिपकार्टच्या ब्युटी ट्रेन्ड्स रिपोर्ट नुसार ७८ टक्के ग्राहक हे सौंदर्याची परिभाषा ही बाह्य मानकांनुसार न करता वैयक्तिक प्राधान्यांनुसार देतांना. विभागातील ग्राहक हे हलकी, दीर्घकाळ टिकणारी आणि विविध लाभ देणाऱ्या उत्पादनांना प्राधान्य देतात, विशेष करुन वॉटरप्रुफ मेकअप, सन केअर आणि डर्मा प्रमाणित स्कीन केअर तसेच सोप्या, कार्यक्षम आणि अनोख्या वैयक्तिक उत्पादनांना वाढते प्राधान्य देत आहेत. याच गतीमानतेला ओळखून भारतातील होमग्रोन ई कॉमर्स मार्केटप्लेस असलेल्या फ्लिपकार्ट तर्फे त्याच्या महत्त्वपूर्ण अशा ब्युटी आणि लाईफस्टाईल उपक्रम ग्लॅम अप फेस्ट २०२६ ची सुरुवात पुण्यात करत असल्याची घोषणा केली असून ट्रेन्ड नुसार सौंदर्याचा अनुभव संपूर्ण भारतात देण्याची सुरुवात केली आहे. पुण्यातील वातावरणावर आधारीत सौंदर्याची आवड ही आकर्षक आहे. वॉटरप्रुफ मेकअपच्या शोधात वार्षिक तुलनेत १.५ पट वाढ झाल असून दुसरीकडे थ्री इन वन आणि फोर इन वन फाऊन्डेशन्स, मॉईस्चराझिंग फाऊन्डेशन्स आणि स्ट्रॉब क्रीम्स ही लक्ष वेधून घेत आहेत, यातून वैयक्तिक मतांसह कार्यक्षमतेचा समतोल हा सौंदर्या बरोबर साधला जात असल्याचे दिसून येते. पश्चिम भारतातील जेनझी ग्राहक हे क्रिएटर्स आणि सोशल फर्स्ट कंटेंट च्या माध्यमातून सौंदर्याचा शोध घेत असून डिजिटल कम्युनिटी केंद्रस्थानी ठेऊन ते नवीन ट्रेन्ड्सचा वापर आणि शोध घेतात.

## उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेची 'मूनफेस्ट'सोबत भागीदारी

■ पुणे (दै. संध्या)

### अंतराळ आणि विज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रेरणा




राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित्त पुण्यातील जी. जी. शाह इंग्लिश मीडियम स्कूलने इंडो सायन्स एज्युकेशन ट्रस्ट आणि ISRO-STC पुणे यांच्या सहकार्याने अंतराळ व विज्ञानविषयक विशेष उपक्रमाचे आयोजन केले. पुणे तसेच आसपासच्या परिसरातील विद्यार्थ्यांना एकत्र आणणाऱ्या या उपक्रमात उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने 'मूनफेस्ट' या संकल्पनेअंतर्गत ब्रँडिंग आणि अनुभव भागीदार म्हणून सहभाग घेतला.

या उपक्रमात ४० शाळांमधील ६३० विद्यार्थ्यांनी एकाच वेळी भारताचा पहिला उपग्रह 'आर्यभट्ट' यांच्या प्रतिकृती तयार केल्या. या उपक्रमाची नोंद एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये करण्यात आली.

विद्यार्थ्यांना अंतराळ विज्ञानाचा प्रत्यक्ष आणि अनुभवात्मक पद्धतीने अभ्यास करता यावा, यासाठी या उपक्रमात मोबाइल प्लॅनेटेरियम, व्हीआर मून वॉक, 3D स्पेस अनुभव, दुर्बिणीद्वारे आकाश निरीक्षण, अंतराळवीरांच्या संकल्पनेवर आधारित इंस्टॉलेशन्स आणि विविध संवादात्मक शैक्षणिक उपक्रम आयोजित करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आणखी एक प्रमुख आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांना ISROच्या शास्त्रज्ञांशी संवाद साधण्याची संधी मिळाली. शास्त्रज्ञांनी भारताच्या अंतराळ कार्यक्रमाबरोबरच उपग्रह तंत्रज्ञान आणि अंतराळ संशोधनातील भारताच्या यशाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. या संवादामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान आणि अंतराळ क्षेत्राबद्दल अधिक जिज्ञासा निर्माण होण्यास तसेच या क्षेत्रात भविष्यात काहीतरी करण्याची प्रेरणा मिळण्यास मदत झाली. 'मूनफेस्ट'मध्ये सहभागी होताना उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेला विद्यार्थ्यांमध्ये आणि तरुण मनांमध्ये जिज्ञासा, ज्ञानाची आवड आणि मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा देणाऱ्या या उपक्रमाशी जोडले जाण्याचा आनंद झाला.

## 'म्युझिक अँड मिरॅकल्स'मधून उपचारासाठी होणार निधी संकलन

६ सप्टेंबरला गणेश कला क्रीडा मंच येथे होणाऱ्या कार्यक्रमात संगीत क्षेत्रातील दिग्गजांचा असेल सहभाग

■ पुणे (दै. संध्या)




पुण्यातील प्रसिद्ध ढोलकीवादक केदार मोरे हे स्वादुपिंडाच्या (Pancreas) कॅन्सरशी झुंज देत असून, त्यांच्या उपचारासाठी लागणारा मोठा खर्च उभारण्यासाठी पुणे आर्टिस्ट फ्रेंड सर्कलतर्फे 'म्युझिक अँड मिरॅकल्स' या विशेष निधी संकलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवार, ६ सप्टेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता गणेश कला क्रीडा मंच, पुणे येथे होणार आहे.

या कार्यक्रमाची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. कमलेश बोकील, योगेश सुपेकर, अमर ओक, सागर घोडके, मिलिंद कुलकर्णी यांनी माहिती दिली. केदार मोरे हे गेल्या अनेक वर्षांपासून संगीत क्षेत्रात कार्यरत असलेले गुणी ढोलकीवादक आहेत. अनेक दिग्गज कलाकारांचे रंगमंचीय कार्यक्रम तसेच संगीतकारांच्या ध्वनिमुद्रणांमध्ये त्यांच्या बहारदार ढोलकीवादनाने महत्त्वाची रंगत आणली आहे. सध्या ते स्वादुपिंडाच्या कॅन्सरने आजारी असून त्यांच्या उपचाराचा खर्च मोठा आहे. डॉ. कमलेश बोकील यांच्या माहितीनुसार, त्यांच्या उपचारासाठी अंदाजे ५० लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

केदार हा आमचा मित्र आणि संगीत क्षेत्रातील अत्यंत गुणी कलाकार आहे. आज तो कॅन्सरशी लढा देत असताना त्याच्या या लढ्यात आपलाही खारीचा वाटा असावा, या भावनेतून 'म्युझिक अँड मिरॅकल्स'चे आयोजन करण्यात आले आहे. संगीताच्या माध्यमातून निधी उभारून केदारच्या उपचारासाठी हातभार लावण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे आयोजकांनी सांगितले.

या विशेष कार्यक्रमात डॉ. सलील कुलकर्णी, बेला शेंडे, केतकी माटेगावकर, रोहित राऊत, कवी संदीप खरे, वैभव जोशी तसेच प्रसिद्ध अभिनेता, गायक व दिग्दर्शक सचिन पिळगावकर यांच्यासह अनेक नामवंत कलाकार सहभागी होणार आहेत.

## 'ईद-ए-मिलाद'निमित्त राष्ट्रवादी युवक काँग्रेसतर्फे महाआरोग्य शिबिराला उत्फूर्त प्रतिसाद

■ पुणे (दै. संध्या)



'ईद-ए-मिलाद'च्या निमित्ताने राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने 'जश्ने ईद-ए मिलादुन्नबी' कार्यक्रम, तसेच महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कॅम्पमधील एमजी रोड परिसरातील सी. टी. पंडोल अँड सन्स दुकानाशेजारी आयोजित शिबिराला नागरीकांना उस्फूर्त प्रतिसाद दिला. यामध्ये जवळपास १२०० जणांनी विविध तपासण्या करुन आवश्यक उपचार घेतले. यावेळी एच. व्ही. देसाई रुग्णालय, डी. वाय. पाटील रुग्णालय, ससून रुग्णालय, कॅन्टोनमेंट रुग्णालय अशा नामांकित रुग्णालयातील डॉक्टर्स व त्यांच्या टिमने नागरिकांच्या तपासण्या केल्या. यामध्ये कान-नाक-घसा, डोळे, दात, रक्तदाब, रक्तातील साखर, बोनमॅरो इतक्या तपासण्या करण्यात आल्या. शिबिराचे उद्घाटन राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष धीरज शर्मा यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार सुनिल कांबळे, माजी महापौर प्रशांत जगताप, राष्ट्रवादी महिला काँग्रेस प्रदेश अध्यक्ष वैशाली ताई नागवडे, राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेश अध्यक्ष निखिल ठाकरे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस अध्यक्ष चिन्मय गाडे, राष्ट्रवादी युवक काँग्रेस पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष व नगरसेवक राकेश कामठे, काँग्रेस माजी विद्यर्थी अध्यक्ष आमिर शेख, नगरसेवक निलेश अल्हाट, माजी नगरसेवक हनीफ शेख, माजी नगरसेवक सुरेखा कवडे, मुन्नोवर कुरेशी, जावेद खान, इलियास शेख, आसिफ खोकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# प्रगत ओव्हरीयन कॅन्सरवर रोबोटिक सीआरएस + एचआयपीईसी शस्त्रक्रिया यशस्वी

## ओपन सर्जरीचा अवलंब न करता रोबोटिक सहाय्याने १२ तासांची ही ऐतिहासिक शस्त्रक्रिया पूर्ण, जी भारतातील अशा मोजक्याच शस्त्रक्रियांपैकी एक ठरली

■ पुणे (दै. संध्या)




चिंचवड, पुणे येथील आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलने प्रगत कर्करोग उपचारात एक महत्त्वाचा टप्पा गाठला, जिथे ५१ वर्षांच्या महिलेवर प्रगत ओव्हरीयन कॅन्सरसाठी पुण्यातील पहिली पूर्णपणे दा विंची रोबोटिक सायटोरिडक्टिव्ह सर्जरी (सीआरएस) आणि हायपरथर्मिक इंट्रापेरिटोनियल केमोथेरपी (एचआयपीईसी)ची एकत्रित शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केल्याची घोषणा केली.

ही शस्त्रक्रिया आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलच्या रोबोटिक सर्जरी नर्सिंग आणि टेक्निकल टीमच्या सहकार्याने पार पडली. यामध्ये आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटल, पुणे येथील गायने ऑन्कोलॉजी व रोबोटिक सर्जन डॉ. निखिल परवते यांच्या नेतृत्वाखालील टीममध्ये कन्सल्टंट सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ. प्रशांत चंद्रा आणि कन्सल्टंट जीआय सर्जन डॉ. निखिल जिल्लावार यांचा समावेश होता. तसेच या शस्त्रक्रियेला ॲनेस्थेशिओलॉजीचे सीनियर कन्सल्टंट डॉ. तानाजी म्हात्रे, इंटेन्सिव्ह केअर युनिटच्या डायरेक्टर डॉ. उर्वी शुक्ला, नेफ्रॉलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. गिरीश कुमठेकर आणि इन्फेक्शियस डिसीजेसचे कन्सल्टंट डॉ. विप्लव वैद्य यांचे सहकार्य लाभले. पत्रकार परिषदेदरम्यान या केसची माहिती देण्यात आली, जिथे वैद्यकीय टीमने या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेचे तपशील आणि शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण करण्यात प्रगत रोबोटिक तंत्रज्ञान व विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांची भूमिका याबद्दल माहिती सांगितली. कोणत्याही टप्प्यावर ओपन सर्जरीचा अवलंब न करता केवळ दा विंची सर्जिकल रोबोटचा वापर करून पूर्ण केलेली भारतातील ही अंदाजे सातवी शस्त्रक्रिया असल्याचा दावा हॉस्पिटलने केला आहे.

सीआरएस + एचआयपीईसी ही उपचारांची अत्यंत गुंतागुंतीची पद्धत आहे, जी पोटाच्या पोकळीत पसरलेल्या प्रगत कर्करोगाच्या निवडक केसेसमध्ये वापरली जाते. यामध्ये पोटातून दिसणारे सर्व ट्युमर काढले जातात आणि त्यानंतर शिल्लक राहिलेल्या सूक्ष्म पेशींना नष्ट करण्यासाठी पोटाच्या पोकळीत गरम केमोथेरपीचे द्रव फिरवले जाते.

ही रुग्ण महिला प्रगत ओव्हरीयन कॅन्सरसह आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलमध्ये आली होती, जो तिच्या पोटात, ओटीपोटात (पेल्विस) आणि फुफ्फुसाच्या आवरणापर्यंत पसरला होता. मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ. वाटेगावकर यांच्या देखरेखीखाली तिच्यावर केमोथेरपीच्या तीन सायकल्स करण्यात आल्या. उपचारांनंतर तिच्या प्रकृतीत लक्षणीय सुधारणा झाली, ज्यामुळे ती मुख्य शस्त्रक्रियेसाठी योग्य ठरली.

त्यानंतर हॉस्पिटलच्या ट्युमर बोर्ड आणि क्रिटिकल केअर, ॲनेस्थेशिया, नेफ्रॉलॉजी आणि संसर्गजन्य रोग (इन्फेक्शियस डिसीजेस) या विभागांतील तज्ज्ञांच्या बहुविद्याशाखीय टीमने (मल्टीडिसिप्लिनरी टीम) या केसचे मूल्यमापन करून शस्त्रक्रियेला मंजूरी दिली. पत्रकार परिषदेत आपले मत व्यक्त करत आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलचे गायने ऑन्कोलॉजी आणि रोबोटिक सर्जन डॉ. निखिल परवते म्हणाले, "पुण्यातील प्रगत कर्करोग शस्त्रक्रियेच्या सीमा अधिक विस्तारण्याच्या आमच्या प्रयत्नांमधील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. ही गुंतागुंतीची सीआरएस + एचआयपीईसी शस्त्रक्रिया पूर्णपणे रोबोटिक सहाय्याने पूर्ण करण्यासाठी रुग्णाची योग्य निवड, सूक्ष्म नियोजन आणि विविध विभागांमधील जवळचा ताळमेळ आवश्यक होता. आमच्यासाठी हे यश केवळ रोबोटिक पद्धतीने शस्त्रक्रिया करण्यापुरते मर्यादित नसून कर्करोगाची गुंतागुंतीची केस हाताळण्यासाठी आवश्यक असलेले तंत्रज्ञान, तज्ज्ञता आणि बहुविद्याशाखीय काळजी (मल्टीडिसिप्लिनरी केअर) एकत्र आणणे हे आहे."

ही शस्त्रक्रिया सुमारे १२ तास चालली, ज्या दरम्यान सर्जिकल टीमने पोटाच्या वेगवेगळ्या भागांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि दिसणारा ट्युमर काढण्यासाठी रोबोटिक सहाय्य घेतले. यानंतर एचआयपीईसी प्रक्रिया करण्यात आली, ज्यामध्ये ४२ अंश सेल्सिअस तापमानाला गरम केलेले सिस्प्लेटिन औषध ९० मिनिटांसाठी पोटाच्या पोकळीत फिरवले गेले. ओपन सर्जरीचा अवलंब न करता ही शस्त्रक्रिया पूर्ण होणे या प्रक्रियेचा एक मुख्य पैलू होता. आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलचे कन्सल्टंट सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ. प्रशांत चंद्रा म्हणाले, "या केसची गुंतागुंत केवळ कर्करोगाच्या प्रसारापुरती मर्यादित नव्हती, तर किमान छिद्र पाडून (मिनीमली इन्व्हेसिव्ह पद्धतीने) ट्युमर पूर्णपणे काढून टाकण्याची आवश्यकता होती. ओपन सर्जरीचा अवलंब न करता ही प्रक्रिया यशस्वीपणे पार पडणे, हे अत्यंत समन्वयीत क्लिनिकल टीमच्या पाठिंब्यासह दा विंची रोबोटच्या प्रगत क्षमतेचे महत्त्व दर्शवते. अशा केसेस दाखवून देतात की, तंत्रज्ञानाची जोड क्लिनिकल तज्ज्ञता आणि सूक्ष्म नियोजनाला मिळते, तेव्हा कर्करोगाच्या गुंतागुंतीच्या उपचारांमधील शक्यता अधिक वाढू शकतात." या प्रक्रियेच्या यशस्वी पूर्ततेमुळे आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलची दा विंची रोबोटिक सर्जरी आणि प्रगत ऑन्कोलॉजी प्रोग्रामसाठी महत्त्वपूर्ण टप्पा गाठला गेला आहे, ज्यामुळे पुणे आणि आसपासच्या परिसरातील रुग्णांसाठी गुंतागुंतीच्या व विशेष कर्करोग उपचार क्षमता उपलब्ध करून देण्याचे हॉस्पिटलचे ध्येय अधिक दृढ झाले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



## आडकर फौंडेशनतर्फे विश्र्वेश कुलकर्णी यांचा जिद्द जीवन गौरव पुरस्काराने गौरव

**पुणे/ दै. संध्या**

जगाला शांततेचा संदेश देणारे भगवान गौतम बुद्ध, भगवान महावीर, भगवान बसवेश्र्वर होऊन गेले. तत्त्वज्ञानात्मक दार्शनिकतेचा संबंध सत्तेशी आहे. हे तत्त्वज्ञान आजची पिढी पेलू शकेल का असा प्रश्न आहे. शांततेचे तत्त्वज्ञान पेलण्यासाठी पोटाची भूक शांत होणे आवश्यक आहे. अशा काळात यशस्वी ग्रुपच्या माध्यमातून माणुसकीचे वकील असणाऱ्या विश्र्वेश कुलकर्णी यांनी तयार केलेले 'शिका व कमवा' हे महाराष्ट्रीय मॉडल कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले. आडकर फौंडेशनतर्फे शिका व कमवा या योजनेद्वारे आर्थिक दुर्बल घटकातील तरुणांना स्वावलंबी शिक्षण रोजगाराचा मार्ग दाखविणारे यशस्वी ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष विश्र्वेश कुलकर्णी यांचा आज (दि. २६) डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते जिद्द जीवनगौरव पुरस्काराने गौरव करण्यात आला. त्यावेळी डॉ. सबनीस बोलत होते. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष भारत सासणे अध्यक्षस्थानी होते. सदाशिव पेठेतील अक्षरवेल सभागृहात आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष सचिन ईटकर, आडकर फौंडेशनचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर मंचावर होते. सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते. विश्र्वेश कुलकर्णी यांचे नेतृत्व देशव्यापी व्हावे, अशा सदिच्छा देऊन डॉ. श्रीपाल सबनीस पुढे म्हणाले, कुलकर्णी यांनी अभिनव योजनेद्वारे पुण्य पेरले, विद्यार्थी घडविले, त्यांच्यात आत्मविश्वास, जिद्द जागविली आणि त्यांच्यातील जिद्दिच्या कर्तृत्वातून अनेक कुटुंबे उभी केली. त्यांचे हे कार्य माणुसकी, देशनिष्ठा जागविणारे आहे. अध्यक्षपदावरून बोलताना भारत सासणे म्हणाले, विश्र्वेश कुलकर्णी यांचे काम देशाला दिशा देणारे आहे. तरीही त्याची दखल शासन पातळीवर घेतली जात नाही. आजच्या तरुणाईच्या अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत तर मोठ्या कोलाहलाचा देशाला सामना करावा लागेल. सत्काराला उत्तर देताना विश्र्वेश कुलकर्णी म्हणाले, नोकरी करायची नाही असा निश्चय करून अनेक उद्योग केले. अडचणींना सामोरे जावे लागल्यामुळे त्यातून शिकायलाही मिळाले. स्पर्धेत टिकायचे आणि पुढे जायचे याच निश्चयाने कार्यरत राहिलो. मिळेल ती संधी स्वीकारत गेलो. माझ्या जिद्दीला अनेकांनी साथ दिली. आर्थिक परिस्थितीमुळे शिकू न शकणाऱ्या मुलांसाठी काही पर्याय नसल्यामुळे त्यांच्यासाठी वेगळी वाट निर्माण केली. या कार्यात यश मिळाले पण त्यामागे संघर्ष होता. सचिन ईटकर म्हणाले, रचनात्मक कार्यातूनच देश घडत असतो. शिका आणि कमवा या योजनेतून विश्र्वेश कुलकर्णी यांचे कार्य खऱ्या अर्थाने रचनात्मक आणि देशाला प्रगतीपथावर नेणारे आहे. स्वयंस्फूर्तीनेच समाजात बदल घडत असतात. अशा लोकांनाच फार कष्ट सोसावे लागतात. सरकारे कोणतीही असली तरी सिस्टिम तिच असते. त्यांना प्रवाहाच्या बाहेर जाऊन काम करायचे नसते. भारताला तरुणांचा देश म्हटले जाते परंतु लाभार्थी योजना बंद झाल्या नाहीत तर तरुणाईला भवितव्य राहणार नाही. तरुणाईला घडविणारे कुलकर्णी खऱ्या अर्थाने रोल मॉडले आहेत. स्वागतपर प्रास्ताविकात ॲड. प्रमोद आडकर यांनी पुरस्काराविषयी माहिती देत आडकर फौंडेशन आणि रंगत-संगत प्रतिष्ठानचा हा सोळाशेवा कार्यक्रम असल्याचे सांगितले. कर्तृत्ववान व्यक्तींचे कार्य समाजासमोर आणून त्यातून समाजाला दिशा मिळावी असा प्रयत्न असल्याचे ते म्हणाले. शिल्पा देशपांडे यांनी सूत्रसंचालन तर योगेश रांगणेकर यांनी मानपत्राचे वाचन केले.

## एथर एनर्जी स्कूटर्स आता सशस्त्र दलातील कर्मचाऱ्यांसाठी कॅन्टीन स्टोअर्स डिपार्टमेंट पोर्टल द्वारे उपलब्ध झाले आहेत

**पुणे/ दै. संध्या**



भारतातील अग्रगण्य इलेक्ट्रिक टू-व्हीलर उत्पादकांपैकी एक असलेल्या एथर एनर्जी ला कॅन्टीन स्टोअर्स डिपार्टमेंट पोर्टलवर विक्री सुरू करण्यास मंजुरी मिळाली आहे. यामुळे पात्र सशस्त्र दलातील कर्मचाऱ्यांसाठी इलेक्ट्रिक स्कूटर्स उपलब्ध होतील. कॅन्टीन स्टोअर्स डिपार्टमेंट पोर्टलवरील विक्री सप्टेंबर 2026 पासून सुरू होण्याची अपेक्षा आहे. एथर च्या 450 आणि रिझ्टा मॉडेल रेंजमधील आठ व्हेरिएंट्स (एथर 450 एपेक्स वगळता) कॅन्टीन स्टोअर्स डिपार्टमेंट प्लॅटफॉर्मवर सूचीबद्ध करण्यात आले आहेत. एथर ही भारतातील पहिल्या दोन इलेक्ट्रिक टू-व्हीलर उत्पादक कंपन्यांपैकी एक आहे ज्यांची उत्पादने कॅन्टीन स्टोअर्स डिपार्टमेंट प्लॅटफॉर्मवर समाविष्ट झाली आहेत. कॅन्टीन स्टोअर्स डिपार्टमेंट लिस्टिंगमुळे पात्र सशस्त्र दलातील कर्मचाऱ्यांना एथर च्या 450 आणि रिझटा रेंजपर्यंत पोहोच मिळेल, तसेच प्लॅटफॉर्मवर खरेदी करताना एथर कडून विशेष सवलतीही मिळतील. या सवलती कॅन्टीन स्टोअर्स डिपार्टमेंट द्वारे खरेदीवर लागू असलेल्या जीएसटी लाभांव्यतिरिक्त असतील, ज्यामुळे एथर स्कूटर खरेदी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अतिरिक्त फायदा होईल. एथर ची 450 रेंज परफॉर्मन्स आणि रोजच्या राइडिंगसाठी तयार करण्यात आली आहे, तर रिझ्टा ही फॅमिली स्कूटर असून आराम, उपयुक्तता आणि दैनंदिन वापरावर लक्ष केंद्रित करते. कॅन्टीन स्टोअर्स डिपार्टमेंट द्वारे उपलब्ध असलेल्या या दोन रेंजमधील आठ व्हेरिएंट्समुळे सशस्त्र दलातील कर्मचाऱ्यांना त्यांच्या वैयक्तिक गरजेनुसार स्कूटर निवडण्याची लवचिकता मिळेल. कॅन्टीन स्टोअर्स डिपार्टमेंट द्वारे एथर स्कूटर्सची उपलब्धता अशा काळात होत आहे जेव्हा देशभरात इलेक्ट्रिक टू-व्हीलर स्वीकारण्याचा वेग वाढत आहे. वाढती उत्पादन उपलब्धता आणि राज्यस्तरीय धोरणे ईव्ही स्वीकारण्यास प्रोत्साहन देत आहेत.

## मावळात ३०० फूट खोल बेकायदा उत्खननाचा आरोप

**पुणे/ दै. संध्या**

मावळ तालुक्यातील आंबळे येथील जमिनीत बेकायदा स्फोटके लावून मोठ्या प्रमाणात दगड-मुरूमाचे उत्खनन करण्यात आल्याचा आरोप स्थानिक शेतकऱ्याने केला आहे. जमिनीत तब्बल २५० ते ३०० फूट खोल उत्खनन करून जमीन उद्ध्वस्त करण्यात आल्याचा दावा करीत शेतकऱ्याने पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयात धाव घेतली आहे. पोलिस आणि महसूल प्रशासनाकडे वारंवार लेखी तक्रारी करूनही दखल घेतली जात नसल्याचा आरोपही तक्रारदाराने केला आहे. स्थानिक शेतकरी विष्णू बाजीराव अंभोरे यांनी पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालय आणि तळेगाव एमआयडीसी पोलिस ठाण्यात याबाबत लेखी तक्रार अर्ज दिला आहे. रामदास काकडे, रणजित काकडे, किरण काकडे आणि युवराज काकडे यांच्याविरोधात हा अर्ज करण्यात आला आहे. अंभोरे यांनी तक्रारीत म्हटले आहे की, संबंधितांनी त्यांच्या जमिनीत बेकायदा स्फोटके लावून उत्खनन केले. दगड फोडण्यासाठी परवानगीच्या अटींचे उल्लंघन करून स्फोटकांचा वापर करण्यात आला. उत्खनन झालेले काही क्षेत्र वनविभागाच्या कक्षेत येत असून, भूजल पातळीपेक्षाही खोलवर खोदकाम करण्यात आले आहे. काही ठिकाणी हे उत्खनन २५० ते ३०० फुटांपर्यंत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. या प्रकरणात महसूल अथवा पोलिस प्रशासनाने स्वतःहून संबंधितांवर कारवाई करणे अपेक्षित होते. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचे अंभोरे यांचे म्हणणे आहे. आपल्या मालकीच्या जागेत स्फोटके लावून उत्खनन करू नये, यासाठी महसूल प्रशासनाकडे वेळोवेळी अर्ज देऊन पंचनामा करण्याची मागणी केली.

# शिक्षणाद्वारे चारित्र्य, मानवी मूल्ये, सर्जनशील विचारांची निर्मिती व्हावी


**■ पुणे (दै. संध्या)**

संतुलित शिक्षण महत्त्वाचे असून त्याचा उद्देश चारित्र्य, मानवी मूल्ये आणि सर्जनशील विचारांची निर्मिती करणे हा असणे आवश्यक आहे. ज्या शिक्षणातून चारित्र्याची निर्मिती होत नाही त्या शिक्षणाला काहीही अर्थ नाही. शिक्षण हा अंधाराकडून प्रकाशाकडे जाण्याचा एकमेव मार्ग आहे, असे प्रतिपादन निवृत्त कर्नल प्रा. शिशिर कुमार यांनी केले.

शैक्षणिक क्षेत्रात आपल्या प्रदीर्घ आणि गौरवशाली वाटचालीचा ठसा उमटविणाऱ्या दि रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेला २९ ऑगस्ट २०२६ रोजी ९९ वर्षे पूर्ण होत आहेत. 'शतकाचा वारसा... भविष्याचा ध्यास!' या संकल्पनेतून संस्थेच्या शताब्दी वर्षाला आज (दि. २६) प्रारंभ झाला.

या निमित्ताने आयोजित विशेष कार्यक्रमात प्रा. शिशिर कुमार बोलत होते. सोमवार पेठ येथील संस्थेच्या सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे अध्यक्ष संजीव ब्रह्मे, कार्याध्यक्ष संजीव महाजन, मानद सचिव प्रफुल्ल निकम, कोशाध्यक्ष निलेश येवलेकर, उपाध्यक्ष भारत वेदपाठक मंचावर होते.

या सोहळ्यात संस्थेच्या शताब्दी वर्षाच्या बोधचिन्हाचे अनावरण, संस्थापक दिन विशेष कार्यक्रम तसेच यंदाच्या बोर्ड परीक्षेत रात्र प्रशालेतील महाराष्ट्रात प्रथम आणि द्वितीय क्रमांक मिळवून यश संपादन केलेल्या वसुप्रद कुलकर्णी, अंकुश रेवाळे या गुणवंत विद्यार्थ्यांचा व एमपीएससी परीक्षेमध्ये यश संपादन केलेल्या निधी अत्रे यांचा गौरव करण्यात आला.




प्रा. शिशिर कुमार पुढे म्हणाले, शिक्षित असलेली व्यक्ती प्रबुद्ध आणि आनंदी असते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना ज्ञानाचा साठा आणि कौशल्ये विकसित करण्याची ताकद देणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या माध्यमातून स्वाभिमानी विद्यार्थी घडण्यास मदत होते. त्यामुळे कोणत्याही शिक्षकाने विद्यार्थ्याचे खच्चीकरण न करता तो कशा पद्धतीने आणि आवडीने शिकेल याचा विचार पेरत त्याच्या मनात बौद्धिक उत्सुकता निर्माण केली पाहिजे. यातूचन प्रत्येक व्यक्ती आयुष्यभर शिकत राहिल आणि ज्ञान आकलन करून घेण्यासाठी प्रश्न विचारत राहिल. दि रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक दूरदृष्टी असलेले होते. त्यांनी संस्थेच्या माध्यमातून समाजाचे भवितव्य बदलून टाकण्यासाठी शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. हीच परंपरा पद्मविभूषण प्रभा अत्रे यांनी अखंडितपणे सुरू ठेवली आणि हेच कार्य संस्थेचे पदाधिकारी पुढे नेत आहेत.

शतक महोत्सवी वर्षाचे सिंहावलोकन करताना संजीव ब्रह्मे म्हणाले, राष्ट्रीय विचाराने प्रेरित होऊन रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली आहे. त्याच प्रमाणे रात्र प्रशाला सुरू करणे हा निर्णयही प्रगल्भपणे घेतला गेला आहे. प्रभाताई अत्रे यांची स्पंदने आजही या वास्तूत जाणवतात. या शाळेचा आलेख सातत्याने उंचावत जाताना दिसतो आहे.

संस्थेच्या कार्याचा आढावा घेताना संजीव महाजन म्हणाले, शतक महोत्सवी वर्षाला सुरुवात होणे ही फक्त कालगणना नव्हे तर इतिहासात घडलेल्या महान कार्याचा गौरव आहे. यात संस्थेचे संस्थापक, पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मुख्यत्वेकरून विद्यार्थ्यांचा मोलाचा वाटा आहे. शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याच्या उद्देशाने संस्था अखंडितपणे कार्यरत आहे.

प्रफुल्ल निकम यांनी संस्थेची भविष्यकाळातील वाटचाल कशी असेल याविषयी अभ्यासपूर्ण माहिती सांगितली. वर्षा महाजन यांनी सूत्रसंचालन केले तर भारत वेदपाठक यांनी आभार मानले. संजीव ब्रह्मे यांनी मान्यवरांचा सत्कार केला.

# करिअरच्या सुरुवातीची मेहनत भविष्यात यशाकडे नेणारी : देशमुख

**■ पुणे (दै. संध्या)**

"करिअरमध्ये सुरुवातीची १५ वर्षे मेहनत घेतली, नवीनवीन गोष्टी शिकलात आणि केवळ पैशांच्या मागे न लागता काम केले, तर भविष्यात हव्या असलेल्या गोष्टी तुमच्याकडे चालत येतात. त्यामुळे कठोर मेहनत, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि नवकौशल्य आत्मसात करीत करिअर घडवावे," असे प्रतिपादन फ्युरेशिया इंडियाचे संचालक (फायनान्स अँड कंट्रोलिंग) सीएम आनंद देशमुख यांनी केले.

दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाऊंटंटस ऑफ इंडियाच्या (आयसीएमएआय) पुणे शाखेतर्फे सीएमए मुख्य (फायनल) आणि पूर्व (इंटरमीजिएट) परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. कर्वेनगर येथील सीएमए भवनात झालेल्या कार्यक्रमावेळी आयसीएमएआय पुणे शाखेचे अध्यक्ष सीएमए राहुल चिंचोळकर, आयसीएमएआयचे माजी अध्यक्ष अमित आपटे, विद्यार्थी समन्वय समितीचे अध्यक्ष सीएमए अमेय टिकले, पुणे शाखेचे उपाध्यक्ष सीएमए हिमांशू दवे, सीएमए निखिल अग्रवाल, माजी अध्यक्ष सीएमए श्रीकांत ईप्पलपल्ली, सीएमए निलेश केकाण, सीएमए नागेश भागणे आदी उपस्थित होते. दुपारच्या सत्रात इंटरमिजिएट परीक्षेतील विद्यार्थ्यांच्या सत्कारावेळी जेएसडब्ल्यू जेएफई नाशिक कंपनीचे मुख्य वित्त अधिकारी सीएमए अमित एरोन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



सीएमए आनंद देशमुख म्हणाले, "परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर नोकरी शोधताना विद्यार्थी साधारणपणे पॅकेज, वर्क फ्रॉम होम, आठवड्याच्या दोन सुट्ट्या, कॉर्पोरेट ऑफीस यांचा प्रामुख्याने विचार करतात. मात्र असे न करता करिअरच्या सुरुवातीच्या काळात विद्यार्थ्यांनी पगाराबरोबरच प्रोफाईल, कंपनीचा आवाका, आपल्याला कोणकोणत्या गोष्टी शिकायला मिळू शकतात याकडे प्रामुख्याने लक्ष द्यायला हवे. एकदा आपल्याला पुरेसे ज्ञान आणि अनुभव आला की आपण आपल्या अटींवर काम करु शकतो." याबरोबरच काम करत असताना आपल्या मूल्यांपासून कधीच दूर जाऊ नका असा महत्त्वाचा सल्लाही त्यांनी यावेळी दिला. सीएमए अमित आपटे म्हणाले, "आपल्याला मिळालेली पदवी ही एखाद्या क्षेत्रात पदार्पण करण्याची प्रवेशिका आहे. मात्र प्रत्यक्ष या क्षेत्रात प्रवेश केल्यानंतर आपण स्वतःचा कशाप्रकारे विकास करतो हे जास्त महत्त्वाचे आहे. आता कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाने अनेक गोष्टी सोप्या झाल्या असल्या तरी त्यावर अवलंबून राहता कामा नये. करिअरमध्ये दीर्घकाळ टिकायचे असेल तर आपल्याला एआयच्या एक पाऊल पुढेच राहावे लागेल.

### मानसी नाईक यांच्या हस्ते क्रिएटिव्ह आई प्रॉडक्शन्स प्रस्तुत

# 'मिस कॉल' गाण्याचा संगीत अनावरण सोहळा संपन्न



**■ मुंबई (दै. संध्या)**

क्रिएटिव्ह आई प्रॉडक्शन्सच्या बॅनरखाली तयार करण्यात आलेल्या 'मिस कॉल' (Miss Call) या नव्या मराठी गाण्याचे नुकतेच अभिनेत्री मानसी नाईक यांच्या हस्ते संगीत अनावरण करण्यात आले. या सोहळ्याला मनोरंजन क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. या गाण्याच्या माध्यमातून प्रसिद्ध बॉलिवूड कोरिओग्राफर मिष्टी भवार यांनी संगीत क्षेत्रात पदार्पण केले आहे. त्यांनी या आधी Netflixच्या 'Sacred Games' या लोकप्रिय वेबसीरिजसाठी तसेच 'Monkey Man' या चित्रपटासाठी काम केले आहे. सध्या ती अभिनेत्री डेझी शाह यांच्यासोबत 'DGP Kashmir' या आगामी चित्रपटासाठी काम करत आहे. मिष्टीने आपल्या कारकिर्दीची सुरुवात फराह खान आणि इतर अनेक नामवंत कोरिओग्राफर्सच्या असिस्टंट म्हणून केली. संजय लीला भन्साळीयांच्या 'रामलीला' या चित्रपटातील 'नगाडा संग ढोल' आणि 'लहू मुँह लग गया' या गाण्यांसाठी असिस्टंट कोरिओग्राफर म्हणून केलेले तिचे काम विशेष उल्लेखनीय ठरले आहे. कार्यक्रमासाठी विशेषकरून मिष्टी यांच्या कथ्थक गुरु डॉ. स्मृतीताई तळपदे उपस्थित होत्या. त्यांनीही मिष्टीच्या कलागुणांचे भरभरून कौतुक करून त्यांना आशीर्वाद दिले. फिल्म कलाकार व डान्स टीचर रामेश्वर पळसकर हे मिष्टी यांना आशीर्वाद देण्यासाठी खासकरून संभाजीनगरहुन आले होते. नृत्यदिग्दर्शनाच्या क्षेत्रात आपल्या कामाचा ठसा उमटवणाऱ्या मिष्टी भवार यांच्यासाठी 'मिस कॉल' हे गाणे त्यांच्या कलाप्रवासातील एक नवे पर्व ठरणार आहे. मिष्टी भवार आणि सतीश पाटील यांची जोडी या गाण्यात पाहायला मिळणार असून, गाण्याची संकल्पना, सादरीकरण आणि संगीत यामुळे 'मिस कॉल' हे गाणे नक्कीच लक्षवेधी ठरणार आहे. या गाण्याला मिलिंद मोरे यांनी संगीत दिले असून, लोकप्रिय गायिका कविता राम यांनी आपल्या सुरेल आवाजात गाणे स्वरबद्ध केले आहे. गाण्याचे चित्रीकरण सिनेमॅटोग्राफर अजय घाडगे यांनी केले आहे. अभिनेत्री मानसी नाईक गाण्याविषयी सांगते, " मी सर्व प्रथम मिष्टी भवार आणि 'मिस कॉल' गाण्याच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन करते. गाण्याची कोरिओग्राफी, गीतरचना तसेच गाण्याच चित्रीकरण अतिशय उत्तम सादरीकरण केल आहे. क्रिएटिव्ह आई प्रॉडक्शन्स हे नावाप्रमाणेच क्रिएटिव्ह गाणी यापुढे ही घेवून येतील यात काही शंका नाही. मिष्टी भवार यांना माझ्याकडून पुढील वाटचालीसाठी मनपूर्वक शुभेच्छा तसेच माझ्या "बघतोय रिक्षावाला" या गाण्याप्रमाणे मिष्टीचं "मिसकॉल" गाण लवकरचं व्हायरल होवूदेत अशी मी आशा करते." अभिनेत्री मानसी नाईक यांनी मिष्टी भवारने लवकरच मला कोरिओग्राफ केलेलं आवडेल अशी इच्छा देखील कार्यक्रमात व्यक्त केली.

अभिनेत्री मिष्टी भवार मिसकॉल गाण्याच्या प्रोसेसविषयी सांगते, "माझ्या आई वडिलांच्या पाठिंब्यामुळे मी या संगीत क्षेत्रात पदार्पण करत आहे. माझी आई केसर भवार यांनी क्रिएटिव्ह आई प्रोडक्शन हाऊस सुरू केल. मिसकॉल या गाण्याची निर्मिती म्हणजे मला माझ्या आईने दिलेल एक सुंदर बर्थडे गिफ्ट आहे. मी माझ्या आईबाबांची कायम ऋणी असेन की त्यांनी मला मनोरंजन क्षेत्रात स्वतःच स्थान निर्मान करण्याची संधी उपलब्ध करून दिली. माझी आयडॉल अभिनेत्री मानसी नाईक यांच्या हस्ते माझ्या पहिल्याच मिसकॉल गाण्याचा संगीत अनावरण सोहळा पार पडण म्हणजे माझ्यासाठी हे स्वप्नवत आहे.

## आळंदी नगरपरिषद कार्यालय, आळंदी

आळंदी ता. खेड, जि.पुणे-४१२१०५
Email ID- alandimc2@gmail.com

जा.क्र.आनपा/बांध/१६७१/२०२६ — दि. २७/०८/२०२६

### जाहिर निविदा सुचना

आळंदी नगरपरिषद आळंदी, ता.खेड, जि.पुणे नगरपरिषद बांधकाम विभागामार्फत आळंदी नगरपरिषद सर्व शाळांमधील पाणी पुरवठा विषयक कामे करणेकरीता खरेदी करीता बाजारभाव मागविण्यात येत आहे. तरी खालील प्रमाणे कागदपत्रे उपलब्ध असलेल्या पुरवठादाराने नगरपरिषदेकडे दिनांक ०४/०९/२०२६ सायं. ५.०० वा. पर्यंत सादर करावेत.

१) व्यवसाय परवाना/दुकान आस्थापना प्रमाणपत्र (शॉप ॲक्ट लायसंस)
२) वस्तु व सेवा कर (जी.एस. टी) प्रमाणपत्र
३) आयकर ओळखपत्र (पॅन कार्ड)

सही/- मुख्याधिकारी | सही/- उपनगराध्यक्षा | सही/- नगराध्यक्ष

## जेजुरी नगरपरिषद, जेजुरी

ता. पुरंदर जि. पुणे
संपर्क: ०२११५-२५३१२३ — ई-मेल- jn6396@gmail.com

जे.न.पा./जा.क्र./अग्री-वृक्ष/२०११/२०२६ — दिनांक :- २७/०८/२०२६

प्रेस नोट

जेजुरी नगरपरीषदेकडे १) संजय नाकाडे यांचाकडील दि.१९/०८/२०२६ रोजी प्राप्त झालेला अर्जानुसार लवथळेश्वर येथील नारळाचे धोकादायक झाड काढून टाकण्याची गरज असल्याचे नमूद असून सदर झाड काढून टाकण्याची परवानगी मिळणेबाबत विनंतीअर्ज केलेला आहे.. तरी याद्वारे सदर अर्ज नागरिकांच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

शिक्का

सही/-
(श्री. चारुदत्त इंगुले)
मुख्याधिकारी
जेजुरी नगरपरिषद

# कर्वे प्राथमिक शाळेत विज्ञानप्रेरक विशेष कार्यक्रम

**■ जेजुरी (दै. संध्या)**

26 भारताच्या अंतराळ संशोधन क्षेत्रातील अभिमानास्पद कामगिरीचा गौरव करण्यासाठी साजरा करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित्त कर्वे प्राथमिक शाळेत विद्यार्थिनींसाठी विज्ञानप्रेरक आणि ज्ञानवर्धक विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

ग्लोबल मिशन ॲस्ट्रॉनॉमी रिसर्च सेंटर (ISRO नोंदणीकृत आकाश शिक्षक संस्था), महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, हेंकल ॲडेजीव्ह इंडिया लिमिटेड आणि भारतीय युवक कल्याण व व्यायाम केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे आकर्षण ठरले ते 'चांद्रयान-३'च्या मोहिमेचा थ्रीडी शो. या माध्यमातून विद्यार्थिनींना भारताच्या ऐतिहासिक चंद्रमोहीमेचा जवळून आणि मनोरंजक पद्धतीने अनुभव घेता आला. यासोबतच विद्यार्थिनींसाठी विशेष तारांगण दर्शनाचा प्रयोग आयोजित करण्यात आला. आकाशातील ग्रह, तारे, नक्षत्रे आणि अंतराळातील विविध घडामोडींची माहिती विद्यार्थिनींना दृकश्राव्य माध्यमातून देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते माजी वैज्ञानिक ए. के. वरिष्ठ निवृत्त ए के सिन्हा यांनी विद्यार्थिनींना अंतराळ संशोधन, भारताची अंतराळ क्षेत्रातील प्रगती आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले.



महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद चे उपसंचालक डॉ. प्रभाकर क्षीरसागर यांनी विद्यार्थिनींनी विज्ञान व संशोधनाकडे अणि अंतराळ विज्ञानाकडे जिज्ञासू वृत्तीने पाहण्याचे आवाहन केले. डॉ. प्रसाद खंडागळे यांनी भविष्यातील अंतराळ वैज्ञानिक तयार करण्यासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व 13 तालुक्यात अवकाश निरीक्षण केंद्र हेन्केल सि एस आर मधुन काढली आहेत अशी माहीती दिली.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः गाव निरगुडे, ता. जुन्नर, जि. पुणे. येथील व आसपासचे सर्व लोकांस आमचे अशिलांनी सांगितलेवरून जाहिर नोटीस देण्यात येते की,

गाव निरगुडे ता. जुन्नर, जि. पुणे येथील विजय सदाशिव परदेशी यांचे मालकीचे खाते क्र. ७९६ वरील जमीन गट नं. ८१७ मधील क्षेत्र ० हे २४ आर, आकार ० रू ४२ पैसे क्षेत्र या मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार आमचे अशिलांबरोबर करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याबाबत सदर मिळकतीवर कोणाचेही, बक्षीस, गहान, दान, लिज, पोटगी, चोळी, बांगडी, खरेदी, साठेखत, करार, मदार, कुळ, वहिवाट, विसार पावती, वाटप, वारस हक्क खरेदी संदर्भात वाद, चतुःसिमाबाबत वाद अगर तक्रार, अतिक्रमण तसेच हिंन्दू कायदयाप्रमाणे अथवा प्रचलित प्रथे प्रमाणे अग्रहक्काचे अधिकार, विरूध्द कब्जा इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क, हितसंबंध नसल्याचा त्यांनी भरोसा दिलेला आहे. सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारची तक्रार किंवा हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत मुळ कागदपत्रांनिशी खात्री पटवून दयावी. अन्यथा सदर मिळकतीत कोणाचेही हक्क, हितसंबंधीत नाहीत व असल्यास त्यांनी खात्रीने जाणीव पुर्वक सोडून दिलेले आहे असे समजून सदरचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल व नंतर कोणाचेही तक्रार चालणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस
ता. २७/०८/२०२६.

श्री. विश्वजीत गोपाळ वर्पे
ॲडव्होकेट
मु.पो. येणेरे, ता. जुन्नर, जि. पुणे.
मो. ९७३०८२८७२१.

## थोडक्यात पण महत्वाचे




### पिंपरी-चिंचवडच्या वाहतुकीला मिळणार नवी दिशा

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी शहरात निगडी ते चाकण मेट्रो मार्ग तयार करण्यात येणार आहे. त्या मार्गाच्या डीपीआरचे तसेच, बोऱ्हाडेवाडी ते वाकड चौक ई-आरटीएस मार्गाचे सादरीकरण आकुर्डी येथील ग. दि. माडगुळकर नाट्यगृहात मंगळवार (दि. 25) करण्यात आले. तसेच, पार्किंग, शौचालय आणि आयलॅण्ड व दुभाजक सुशोभिकरण धोरणांचेही सादरीकरण नगरसेवकांसमोर केले गेले. या वेळी महापौर रवी लांडगे, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे, विविध विषय समितीचे सभापती, शहर अभियंता मनोज सेठिया तसेच, सुमारे 90 नगरसेवक उपस्थित होते. महापालिकेच्या 20 ऑगस्टच्या सर्वसाधारण सभेत हे सादरीकरण करण्यात आले होते. मात्र, तेथील स्क्रीनवर व्यवस्थित चित्र दिसत नव्हते. त्यावर अनेक नगरसेवकांनी आक्षेप घेतला होता. त्यामुळे महापौर रवी लांडगे यांनी नगरसेवकांसाठी स्वतंत्रपणे सादरीकरण घेण्याची सूचना संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना दिले होते. त्यानुसार मंगळवारी हे सादरीकरण करण्यात आले. निगडी ते चाकण या टप्पा दोनच्या मेट्रो मार्गाचे सादरीकरण महामेट्रोच्या अधिकाऱ्यांनी केले. हा 47.295 किलोमीटर अंतराचा मार्ग आहे. त्यात एकूण 34 मेट्रो स्टेशन असून, त्यातील 28 स्टेशन हे शहरात आहेत. त्यासाठी 12 हजार 937 कोटी 23 लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या मार्गामुळे पिंपरी-चिंचवड एमआयडीसीसह हिंजवडी आयटी पार्क आणि चाकण एमआयडीसी एकमेकांना जोडली जाणार आहे. या मार्गामुळे संपूर्ण शहर मेट्रोने जोडले जाणार आहे. निगडी येथील भक्ती-शक्ती समुह शिल्प स्टेशन येथे मेट्रोचे ट्रान्स्पोर्ट हब होणार आहे. बोऱ्हाडेवाडी, मोशी येथील आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र ते वाकड चौकापर्यंत सुमारे 17 किलोमीटर अंतराच्या बीआरटीएस मार्गावर इलेक्ट्रिक रॅपिड ट्राञ्झिस्ट सिस्टिम (ई-आरटीएस) सेवा प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात येणार आहे. त्या ई-आरटीएस ई-बससेवेचेही सादरीकरण करण्यात आले. महापालिकेच्या शहरी दळणवळण विभागाने संपूर्ण शहरासाठी पार्किंग पॉलिसी धोरण तयार केले आहे. त्यामुळे शहरात रस्त्याच्याकडेला व पार्किंग झोनमध्ये वाहन लावण्यासाठी शुल्क आकारले जाणार आहे. वाहनचालकांना तासानुसार शुल्क आकारले जाणार आहे. रस्त्यापासून जवळच्या अंतरावर असलेल्या पार्किंग झोनसाठी कमी शुल्क असणार आहे. तसेच, महिन्याचे पासही दिले जाणार आहे. कोणत्या वाहनास कोणत्या ठिकाणी किती शुल्क यांची माहिती देण्यात आली. ही योजना सर्व दहा क्षेत्रीय कार्यालयानिहाय राबवली जाणार आहे. या दोन्ही महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्त्वतः मंजुरी देऊन महापालिकेने मान्यता देण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश आयुक्तांना दिले आहेत. शहराच्या स्वच्छतेमध्ये आणि आरोग्यविषयक मानकांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी सार्वजनिक शौचालय धोरण सविस्तरपणे मांडण्यात आले. प्रत्येक भागात महिला, पुरुष व दिव्यांगांसाठी आधुनिक, स्वच्छ व सुसज्ज सार्वजनिक स्वच्छतागृहांची निर्मिती करण्याचे नियोजन आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात सुसज्ज शौचालये निर्माण केले जाणार आहेत.

### जागा ताब्यात नसतानाच इंद्रायणी नदीसुधार प्रकल्पाची घाई

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने मुळा नदीनंतर आता इंद्रायणी नदीसुधार प्रकल्प राबवण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी आवश्यक प्रमाणात जागा उपलब्ध नाही. तसेच, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कठोर अटी व शर्तींचे पालन करूनच काम वेळेत पूर्ण करण्याच्या सक्त सूचना आहेत. प्रकल्पातही अनेक झाडांची कत्तल केली जाणार आहे. महापालिका प्रशासनाचा मनमर्जी कारभार पाहता, काम सुरू झाल्यानंतर हाही प्रकल्प वादात सापडण्याची लक्षणे दिसत आहेत. एकूण १८.५० किलोमीटर अंतराच्या इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पासाठी ४३० कोटी ७५ लाख खर्चास स्थायी समितीने १ जुलैला मान्यता दिली आहे. त्यानंतर लगेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात येणार होते. त्याचा दिवसही ठरला होता. त्यासाठी तयारीही करण्यात आली होती. मात्र, अतिपावसामुळे तो कार्यक्रम ऐनवेळी रद्द करण्यात आला. त्यानंतर ८ जुलैला झालेल्या मोशी कचरा डेपोतील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पातील अनधिकृत इमारत कोसळून ९ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे भूमिपूजनचा कार्यक्रमच रद्द करण्यात आला. तसेच, हा प्रकल्प राबवणारा पर्यावरण आभियांत्रिकी विभागाच अडचणीत सापडला आहे. त्या विभागाचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी आणि कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट यांना आयुक्तांनी निलंबित केले आहे. त्यांची विभागीय चौकशी सुरू आहे. अशी परिस्थिती असतानाही प्रशासनाने इंद्रायणी नदी प्रकल्पाची तातडीने वर्क ऑर्डर दिली आहे. प्रकल्पासाठी अनेक ठिकाणच्या जागा अद्याप महापालिकेच्या ताब्यात आल्या नाहीत. प्रकल्पासाठी मोठ्या संख्येने जुन्या झाडांची कत्तल करावी लागणार आहे. त्यासाठी उद्यान व वृक्ष संवर्धन विभागाची परवानगी घेण्यात येत आहे. त्या विभागाने परवानगी दिल्यानंतरच काम सुरू करता येणार आहे. तसेच, रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग, पर्यावरण विभाग, वन विभाग, पाटबंधारे विभाग व इतर विभागांच्या सर्व परवानग्या घेणे सक्तीचे करण्यात आले आहे. हा प्रकल्प केंद्र शासनाच्या अमृत २.० या अभियानांतर्गत राबवण्यात येत आहे. त्यासाठी सर्व प्रकाराच्या नियमांचे पालन करणे महापालिकेवर बंधनकारक आहे. प्रकल्पास तांत्रिक मान्यता देताना राज्य शासनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अटी व शर्तींनुसार हा प्रकल्प दोन वर्षात पूर्ण करण्याची अट घातली आहे. तसे न केल्यास महापालिकेवर कारवाईचा बडगा उगारला जाऊ शकतो. प्रत्यक्ष काम सुरू झाल्यानंतर शासन २० टक्के, ४० टक्के आणि ४० टक्के असा तीन टप्प्यांत महापालिकेस निधी देणार आहे. नियमभंग झाल्यास तो निधी शासनाकडून रोखला जाऊ शकतो.

### पिंपरी-चिंचवडमध्ये विना नंबरप्लेट वाहने सर्रास रस्त्यावर

पिंपरी : दैनिक संध्या

शहरातील विविध भागांत तसेच उपनगरांमध्ये विना नंबरप्लेटची अनेक वाहने सर्रास रस्त्यावरून धावताना दिसतात. दिवसाढवळ्या वाहतूक नियमांचे उल्लंघन करून ही वाहने रस्त्यावरून धावत असतानाही याकडे वाहतूक विभागाचेही दुर्लक्ष होत आहे. अशा विना नंबरप्लेट धावणाऱ्या वाहनांमुळे अपघात घडल्यास जबाबदार कोण, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. पिंपरी-चिंचवड शहर परिसरात दररोज लाखोंच्या संख्येने वाहने रस्त्यावरून धावत असतात. त्यातील अनेक वाहने ही विनानंबर प्लेटची असल्याचे दिसून येते. तर काही वाहनांवर नियमबाह्य अथवा स्पष्टपणे न दिसणाऱ्या नंबर प्लेट असल्याचे चित्र आहे , तसेच वाहनांवरील हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (एचएसआरपी) संदर्भातील नियमांची अंमलबजावणी सुरू असतानाही शहरातील काही वाहनांवर अद्याप जुन्या पद्धतीच्या किंवा अस्पष्ट नंबर प्लेट दिसून येत आहेत.

# पालिकेच्या-सरकारी इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट कागदावरच?

**धोकादायक इमारतींमध्ये जीव मुठीत : जीर्ण इमारतींची डागडुजीही रखडली; अधिकारी-कर्मचाऱ्यांसह रोज शेकडो नागरिकांचा वावर**

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी शहरातील महापालिकेच्या आणि सरकारी इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले आहे. तसेच, धोकादायक इमारतींची आवश्यक डागडुजी करण्यात येत आहे, असे दावे संबंधित यंत्रणा प्रसनाकडून वेळोवेळी करण्यात आले आहेत, परंतु प्रत्यक्षात या इमारतींची परिस्थिती 'जैसे-थे'च असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे प्रसासनाचे दावे केवळ कागदावरच आहेत की काय, असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. शहरामध्ये महापालिकेचे काही दवाखाने, सरकारी कार्यालये, तहसील कार्यालये तसेच विविध शासकीय इमारतींमध्ये अद्यापही स्ट्रक्चरल ऑडिट झाल्याचे स्पष्टपणे दिसत नाही. काही ठिकाणी इमारतींची अवस्था चिंताजनक असतानाही तात्पुरती डागडुजी किंवा सुरक्षेच्या उपाययोजनांकडेही दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. दररोज या इमारतींमध्ये अधिकारी-कर्मचारी काम करतात, तर विविध कामांसाठी शेकडो नागरिक ये-जा करतात. त्यामुळे इमारतींची पडझड झाली किंवा एखादा भाग अचानक कोसळला तर त्याची जबाबदारी नेमकी कोणाची? दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का? असा सवाल नागरिक विचारत आहेत.एका बाजूला 'स्ट्रक्चरल ऑडिट केले', 'धोकादायक इमारतींची पाहणी केली' असे दावे केले जातात. मात्र, दुसऱ्या बाजूला प्रत्यक्ष ठिकाणी परिस्थिती जैसे थे असल्याचे दिसत असेल, तर या ऑडिटचा उपयोग नेमका कोणासाठी झाला, असा प्रश्न निर्माण होतो.








## राम यादव अडसुळ यांनी रचला इतिहास; शीर्षासन करून वर्ल्ड रेकॉर्डची नोंद

■ पिंपरी (दै. संध्या)

वय हे केवळ एक आकडा असल्याचे सिद्ध करत ६९ वर्षीय श्री राम यादव अडसुळ यांनी उल्लेखनीय कामगिरी करत इतिहास रचला आहे. देहूरोड येथे आयोजित विशेष विक्रम प्रयत्नादरम्यान त्यांनी सुमारे ३ फूट उंच टेबलवर ८.२२ सेकंद शीर्षासन (Headstand) करून अनोखा विश्वविक्रम प्रस्थापित केला. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीची नोंद इंटरनॅशनल एक्सलन्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स (IEA Book of World Records) मध्ये करण्यात आली आहे.

हा विक्रम प्रयत्न IEA Book of World Records च्या ज्युरी पॅनलच्या देखरेखीखाली पार पडला. निर्धारित आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वे व पडताळणी प्रक्रियेचे पालन करून ज्युरी सदस्यांनी या विक्रमाची अधिकृत नोंद व सत्यापन केले.

यावेळी डॉ. संदीप सिंह (मुख्य कार्यकारी अधिकारी - IEA Book of World Records) तसेच योगसद्गुरू डॉ. कृष्णदेव गिरीजी महाराज (राष्ट्रीय ज्युरी, महाराष्ट्र) हे प्रमुख उपस्थित होते. त्यांनी श्री अडसुळ यांच्या जिद्द, चिकाटी आणि समर्पणाचे कौतुक करत ही कामगिरी समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार म्हणून अमर राम अडसुळ, लहू राम अडसुळ, डॉ. राजेंद्र ताकले, दीपक मित्तल, सुशीलकुमार गोयल, आकाश गायकवाड आणि मानव लोहेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमास माध्यम प्रतिनिधी म्हणून सागर खोट, शुभम खोट, नवशाद अन्सारी आणि नेहा सोनवणे यांनी उपस्थिती लावली. विक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर श्री राम यादव अडसुळ यांना ट्रॉफी, मेडल, बॅज, प्रमाणपत्र आणि रेकॉर्ड किट प्रदान करून गौरविण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी श्री अडसुळ यांच्या कार्याचे कौतुक करत, "जिद्द, आत्मविश्वास आणि सातत्य असेल तर कोणत्याही वयात नवा इतिहास घडवता येतो," असे मत व्यक्त केले. इंटरनॅशनल एक्सलन्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स (IEA) ही संस्था जागतिक स्तरावरील असामान्य कामगिरी, विशेष कौशल्ये आणि विक्रमांची नोंद, पडताळणी व सन्मान करणारे आंतरराष्ट्रीय व्यासपीठ आहे.

श्री राम यादव अडसुळ यांच्या या अभिमानास्पद यशाबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत असून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## २१ वा 'आशा भोसले पुरस्कार' श्रेया घोषाल यांना जाहीर : भाऊसाहेब भोईर

■ पिंपरी (दै. संध्या)

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पिंपरी चिंचवड शाखा, पिंपरी चिंचवड कलारंग प्रतिष्ठान आणि सिद्धिविनायक ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय स्तरावर संगीत क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या गायक, संगीतकार यांना दरवर्षी प्रदान करण्यात येतो. यावर्षीचा हा २१ वा प्रतिष्ठित 'आशा भोसले पुरस्कार २०२६' सुप्रसिद्ध पार्श्वगायिका श्रेया घोषाल यांना जाहीर करण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांच्या हस्ते हा भव्य पुरस्कार वितरण सोहळा शनिवारी, (दि. २९ ऑगस्ट) सायं. ५ वाजता, चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे रंगणार आहे अशी माहिती अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पिंपरी चिंचवड शाखा अध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले की, या सोहळ्यास विधानसभेचे उपाध्यक्ष मा. अण्णा बनसोडे, पिंपरी चिंचवडचे महापौर रवी लांडगे, ज्येष्ठ संगीतकार पं. हृदयनाथ मंगेशकर, आमदार अमित गोरखे, मनपा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शहराध्यक्ष योगेश बहल आदींसह कला, सांस्कृतिक क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. "आशा भोसले" या पुरस्काराचे स्वरूप रु. १,११,०००/- (एक लाख ११ हजार रुपये) रोख, शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह असे आहे. पुरस्कार वितरण सोहळ्यात मोरया थिएटर निर्मित 'आशा से श्रेया तक' हा विशेष सांगीतिक कार्यक्रम रंगणार आहे. यामध्ये हिंदी चित्रपटसृष्टीवर आपल्या सुरेल आवाजाची छाप उमटविणाऱ्या गानसम्राज्ञी आशा भोसले आणि श्रेया घोषाल यांच्या गाजलेल्या सदाबहार गीतांची मैफल रसिकांना अनुभवता येईल. हा संपूर्ण सोहळा सर्व संगीतप्रेमी व नागरिकांसाठी विनामूल्य आहे. कार्यक्रमाच्या नियोजित वेळेच्या अर्धा तास आधी प्रेक्षकांनी आसनस्थ व्हावे. पिंपरी चिंचवड शहर परिसरातील तमाम रसिकांनी या सांगीतिक व सांस्कृतिक मेजवानीचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष भाऊसाहेब भोईर, यांनी केले आहे. बुधवारी चिंचवड येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत यावेळी नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष किरण येवलेकर, कोषाध्यक्ष राजेंद्र बंग, सहकार्य संतोष रासने, गौरी लोंढे, सह कोषाध्यक्ष संतोष शिंदे, सदस्य सुदाम परब आदी उपस्थित होते. नाट्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेच्या या प्रतिष्ठित आशा भोसले पुरस्कारासाठी स्वतंत्र निवड समिती आहे. समितीमध्ये ज्येष्ठ संगीतकार पं. हृदयनाथ मंगेशकर, डॉ. रवींद्र घांगुर्डे, वंदना घांगुर्डे, दिलीप काटकर, राजेशकुमार साकला आणि भाऊसाहेब भोईर यांचा समावेश आहे. या पुरस्काराची सुरुवातीपासूनच गौरवशाली परंपरा राहिली आहे. सन २००२ पासून अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखेतर्फे हा राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार दिला जातो. यापूर्वी हा सन्मान गानकोकिळा स्व. लता मंगेशकर, संगीतकार खय्याम, रवींद्र जैन, बप्पी लहरी, प्यारेलालजी, आनंदजी, पं. हृदयनाथ मंगेशकर, उषा मंगेशकर, अनु मलिक, शंकर महादेवन, पं. शिवकुमार शर्मा, सुरेश वाडकर, हरीहरन, सोनू निगम, सुनिधी चौहान, पद्मभूषण उदित नारायण, रूपकुमार राठोड, अवधूत गुप्ते, डॉ. सलील कुलकर्णी आणि शान (शांतनू मुखर्जी) यांसारख्या संगीतातील दिग्गजांना प्रदान करण्यात आला आहे. यावर्षीच्या मानकरी श्रेया घोषाल यांच्या विषयी :- भारतीय संगीत विश्वात आपल्या सुमधुर आवाजाने स्वतंत्र ठसा उमटवणाऱ्या श्रेया घोषाल (जन्मः १२ मार्च १९८४) यांनी वयाच्या अवघ्या ४ थ्या वर्षापासून संगीताचे धडे गिरवण्यास सुरुवात केली. कोटा येथे पं. महेशचंद्र शर्मा आणि मुंबईत मुक्ता भिडे यांच्याकडे हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी झी टीव्ही वरील 'सारेगामापा' (चिल्ड्रेन स्पेशल) चे विजेतेपद पटकावले. 'देवदास' (२००२) चित्रपटातील 'बैरी पिया' आणि 'डोला रे' या गाण्यांनी त्यांच्या बॉलिवूड कारकिर्दीची यशस्वी सुरुवात झाली. हिंदी, मराठी, बंगाली, तमिळ, तेलुगू, कन्नड, मल्याळम, आसामी, भोजपुरी आणि पंजाबी अशा २० हून अधिक भाषांमध्ये हजारो अजरामर गाणी गायली आहेत. 'जादू है नशा है', 'बरसो रे', 'तेरी ओर', 'ये इश्क हाय', 'दीवानी मस्तानी' तसेच मराठीतील 'जीव दंगला' व 'मेरे ढोलना' ही त्यांची काही प्रसिद्ध गाणी आहेत.



### श्रेया घोषाल यांना ५ राष्ट्रीय चित्रपट

श्रेया घोषाल यांना ५ राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, 'देवदास', 'पहेली', 'जब वी मेट', 'जोगवा' इत्यादी), ७ फिल्मफेअर पुरस्कार (आरडी बर्मन न्यू म्युझिक टॅलेंट अवॉर्डसह) आणि १० हून अधिक फिल्मफेअर साऊथ पुरस्कार. याशिवाय अमेरिकेतील ओहायो राज्याने २६ जून हा दिवस "श्रेया घोषाल डे" म्हणून घोषित केला आहे. लंडन येथील युनायटेड किंगडमच्या (लंडन) संसदेत त्यांना भारतीय संगीतातील अतुलनीय योगदानासाठी विशेष सन्मानाने गौरविले गेले आहे. भारतातील १०० प्रसिद्ध आणि प्रभावशाली व्यक्तींच्या "फोर्स सेलिब्रेटी १००" यादीत त्यांचा अनेकदा समावेश झाला आहे. झी सिने, स्क्रीन आणि अनेक राज्य शासनांचे पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.

## देहूनगरीत 'नमामि इंद्रायणी महाआरती' भक्तिभावात संपन्न

■ पिंपरी (दै. संध्या)

पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी बांधण्यात आलेले पदपथ सध्या वाहनांच्या पार्किंगसाठी वापरले जात असल्याचा धक्कादायक प्रकार पिंपळे गुरव येथील भैरवनाथनगर परिसरात समोर आला आहे. जगताप पाटील पेट्रोल पंपाच्या पुढे भगतसिंग चौकाच्या दिशेने जाताना असलेल्या वळणाजवळ चारचाकी वाहने थेट पदपथावर उभी केली जात असल्याने नागरिकांना नाईलाजाने मुख्य रस्त्यावरून चालावे लागत आहे. त्यामुळे या ठिकाणी अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे. या ठिकाणी रस्ता वळणाचा असल्याने आधीच वाहनचालकांना समोरून येणाऱ्या वाहनांचा अंदाज घेणे काहीसे कठीण होते.

त्यातच पदपथावर चारचाकी वाहने उभी राहत असल्याने पादचाऱ्यांचा मार्गच बंद होत आहे. परिणामी नागरिकांना वाहनांच्या बाजूने मुख्य रस्त्यावरून चालत जावे लागत आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या ठिकाणी एखादा गंभीर अपघात घडण्यापूर्वी संबंधित महापालिका विभाग आणि वाहतूक पोलिसांनी तातडीने पाहणी करून पदपथावरील वाहनांचे पार्किंग थांबवावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

पदपथ कायमस्वरूपी मोकळे राहतील यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात आणि पादचाऱ्यांना सुरक्षित मार्ग उपलब्ध करून द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पादचाऱ्यांना सुरक्षितपणे चालता यावे, यासाठी लाखो रुपये खर्च करून पदपथ तयार केले जातात. मात्र, त्याच पदपथावर वाहने उभी राहत असतील तर नागरिकांनी सुरक्षितपणे चालायचे कुठून, असा प्रश्न उपस्थित होत आहे. पदपथावर वाहनांचा ठिय्या असल्याने पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.







## थोडक्यात पण महत्वाचे



### गुळुंचवाडी व आर्वी परिसरात बिबट्याचे दर्शन

**नारायणगाव : दैनिक संध्या**

जुन्नर तालुक्यातील आर्वीकेंद्र परिसरातील अब्दुल ताशेवाले यांच्या घराजवळील शेतात काल रात्री शेताला पाणी भरताना बिबट्याचे दर्शन झाले.तसेच गुळुंचवाडी येथील शिदरमुख परिसरात बिबट्याची दहशत कमालीची वाढली आहे. गेल्या काही दिवसांत परिसरात भर दिवसा नागरिकांना बिबट्याचे दर्शन घडत असल्याने, स्थानिक नागरिकांमध्ये अत्यंत भीतीचे आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शिदरमुख परिसरातील निसर्गरम्य भागात बिबट्याचा वावर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. काही दिवसांपूर्वी भर दुपारी एका खडकावर बिबट्या बराच वेळ ठाण मांडून बसल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले. शेतकऱ्यांना आपल्या शेतातील कामांसाठी दररोज बाहेर पडावे लागते, मात्र आता दिवसाही बिबट्या दिसत असल्याने शेतात एकट्याने जाणे धोक्याचे झाले आहे. दिवसाढवळ्या व रात्रीसुद्धा बिबट्या उघडपणे फिरत असल्याने शेतकरी, महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच गुळुंचवाडी आणि आसपासच्या परिसरात बिबट्याने यापूर्वी अनेकदा शेतकऱ्यांच्या पाळीव प्राण्यांवर आणि पशुधनावर हल्ले केले आहेत. सुरक्षेचा उपाय म्हणून शेतकऱ्यांनी शेतात जाताना समूहाने जावे आणि एकटे जाणे टाळावे, असे आवाहन करण्यात येत आहे.या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन वनविभागाने तात्काळ शिदरमुख आणि गुळुंचवाडी परिसराची पाहणी करावी, अशी मागणी करण्यात येत आहे. बिबट्याचा वावर असलेल्या ठिकाणी तातडीने पिंजरा लावून त्याला जेरबंद करावे, अशी मागणी गुळुंचवाडीचे उपसरपंच विजय गुंजाळ यांनी केली आहे. तसेच वनविभागाने नागरिकांना सतर्कतेच्या सूचना द्याव्यात आणि विशेषतः लहान मुले व महिलांनी काळजी घ्यावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.





### रेडिअन्स इंटरनॅशनल स्कूलमध्ये केरळचा प्रसिद्ध आणि पारंपारिक सण 'ओणम' उत्साहात साजरा

**नारायणगाव : दैनिक संध्या**

रेडिअन्स इंटरनॅशनल स्कूलमध्ये केरळचा प्रसिद्ध आणि पारंपारिक सण 'ओणम' अत्यंत उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना भारताच्या समृद्ध सांस्कृतिक विविधतेची ओळख व्हावी आणि त्यांच्यात एकतेची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने शाळेत इयत्ता ६ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांसाठी एका भव्य 'फ्लोरल रांगोळी' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने सहभाग घेऊन संपूर्ण शाळा परिसर विविध प्रकारच्या सुगंधी फुलांनी आणि रंगीबेरंगी नक्षीकामांनी सजवून टाकला. शाळेने नेहमीच गुणवत्तेसोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य दिले आहे. आजच्या या स्पर्धेतही विद्यार्थ्यांमधील अफाट कल्पकता, उत्कृष्ट सांघिक कार्य आणि व्यवस्थापन कौशल्य पाहायला मिळाले. या उत्सवाचे आणखी एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे इयत्ता १ ली ते १० वीच्या सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या टिफिनमध्ये खास पारंपारिक दाक्षिणात्य भोजन आणले होते. दुपारच्या जेवणाच्या सुट्टीत विद्यार्थ्यांनी एकमेकांसोबत इडली, डोसा, वडा आणि उत्तम सांबार अशा विविध पदार्थांचा आस्वाद घेत सहभोजनाचा आनंद लुटला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये केवळ खाद्यसंस्कृतीची देवाणघेवाण झाली नाही, तर एकत्र राहण्याची आणि वाटून घेण्याची सुंदर सवयही दृढ झाली. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले. उपप्राचार्य श्री. लक्ष्मीकांत गुंडारगी सर आणि प्राचार्य सौ. वर्षा मदभावीकर यांचे मार्गदर्शन लाभले.

### पुरंदर तालुका समन्वयकपदी चंद्रकांत झगडे यांची निवड

**जेजुरी : दैनिक संध्या**



क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती निमित्त आयोजित विविध कार्यक्रम व उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी देवमळा / जेजुरी ग्रामीण दवणेमळा येथील चंद्रकांत बबन झगडे यांची पुरंदर तालुका समन्वयक पदी निवड करण्यात आली आहे. महात्मा ज्योतीराव फुले यांच्या विचारांचा व सामाजिक समतेचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी होणाऱ्या सर्व कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून झगडे यांचेवर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. महात्मा फुले द्विशताब्दी जयंती उत्सव समितीचे राज्य समन्वयक उत्तम गोरे, अँड नितीन म्हेत्रे, सुनील वांजरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवला जाणार आहे.



### प्राचार्य हनिफ मुजावर यांचा सेवानिवृत्त समारंभ

**पुरंदर : दैनिक संध्या**

पुरंदर हायस्कूलच्या हिरक महोत्सव व प्राचार्य मा. हनिफ मुजावर सर यांच्या सेवानिवृत्त समारंभासाठी उपस्थित राहून शुभेच्छा देत असताना पुणे जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष, दै. लोकमतचे पत्रकार, हॉटेल लोणकरवाडा मालक मा. सुनील लोणकर समवेत कवी, बहुआयामी व्यक्तिमत्व प्रा. केशवराव काकडे सर, आदर्श शिक्षिका सौ. मनिषा गणेश कामठे मॅडम व सौ.सरवतजहान तोफिक बागवान मॅडम उपस्थित होत्या.

# मुख्य आरोपी बाळ्या उर्फ दत्ता लोंढे पोलिसांच्या ताब्यात

■ **उरुळी कांचन (दै. संध्या)**

पुण्यातील विषारी दारू हत्याकांडातील मुख्य आरोपी बाळ्या उर्फ दत्ता लोंढे याला उरुळी कांचन पोलिसांनी सापळा रचून ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. उरुळी कांचन परिसरात हातभट्टी दारूचा मोठा व्यवसाय चालविणाऱ्या लोंढेचा पोलिसांकडून शोध सुरू होता.

पुण्यातील विषारी दारू प्रकरणात २१ जणांच्या मृत्यूला कारणीभूत ठरल्याचा आरोप बाळ्या उर्फ दत्ता लोंढेवर आहे. पोलिसांची नजर चुकवण्यासाठी तो वेशभूषा बदलून परिसरात फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर उरुळी कांचनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयमाला पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी सापळा रचत त्याला ताब्यात घेतले.

लोंढेला ताब्यात घेतल्यानंतर पुढील कायदेशीर प्रक्रियेसाठी त्याला सीआयडीच्या ताब्यात देण्यात येणार असल्याची माहिती आहे.

दरम्यान, पुण्यातील विषारी दारू हत्याकांडाची गंभीर दखल घेत सीआयडीकडून या प्रकरणातील आरोपींवर मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे बाळ्या उर्फ दत्ता लोंढेच्या अटकेकडे या संपूर्ण प्रकरणातील महत्त्वाची कारवाई म्हणून पाहिले जात आहे.

उरुळी कांचन परिसरातील अवैध हातभट्टी दारूच्या व्यवसायावर या कारवाईमुळे मोठा आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सीआयडीकडून करण्यात येणार आहे.



## लॅबोरेटरी टेक्निशियन कर्मचाऱ्यांची कार्यशाळा उत्साहात संपन्न

■ **चाकण (दै. संध्या)**

पुणे जिल्हा लॅबोरेटरी टेक्निशियन कर्मचाऱ्यांची कार्यशाळा मोठ्या दिमाखात संपन्न झाली. अक्लॅप संघटना लॅबोरेटरी टेक्निशियन कर्मचाऱ्यांची कार्यशाळा येथे प्रथमच आयोजित करण्यात आल्याने प्रचंड प्रतिसाद मिळाला.

राज्य संघटनेचे अध्यक्ष प्रशांत गुळेकर व डॉ. संतोष बोरकर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून या कार्यशाळेचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी सचिव रमेश चौघुले, खजिनदार उमेश सोनार, संचालक संजय जाधव, रघुनाथ भोंगळे, मोहन मेटकरी, दिलीप पोकळे, किशोर चव्हाण, विलास मांजरे, खेड तालुका अध्यक्ष चंद्रकांत हिवरकर आदींसह लॅबोरेटरी कर्मचारी, संचालक, संघटना पदाधिकारी व सभासद मोठया संख्येने उपस्थित होते.

डॉ. संतोष बोरकर यांनी संधिवात व इतर सांध्याचे आजार यासाठी प्रयोशाळा चाचण्या निदान करण्यासाठी किती महत्वाच्या असतात या बाबत माहिती दिली. प्रशांत गुळेकर यांनी गुणवत्ता पूर्वक सेवा देण्यासाठी शैक्षणिक पात्रता व शासन कायदा धोरण याविषयी मार्गदर्शन केले. रमेश चौघुले यांनी संघटनेची एकजूट व पुढील वाटचाल यावर विचार मांडले. संघटनेचे सभासद वाढले पाहिजे याविषयी संघटनेचे अध्यक्ष मोहन मेटकरी व दिलीप पोकळे यांनी विचार व्यक्त केले.

नवीन स्वीकृत संचालक व नवीन सभासद यांना यावेळी प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. सुधीर भालेराव यांनी आभार मानले. या कार्यशाळेचे आयोजन खेड तालुक्याच्या वतीने करण्यात आले होते. चंद्रकांत हिवरकर यांनी सूत्रसंचालन केले. कार्तिकी गायकवाड यांनी गणेश वंदन गायीले.




## चाकण मध्ये एकल महिला सर्वेक्षण उपक्रमास प्रारंभ

■ **चाकण (दै. संध्या)**

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या आदेशानुसार चाकण नगरपरिषदेच्या महिला व बाल कल्याण विभागाच्या वतीने शहरामध्ये 'एकल महिला सर्वेक्षण कार्यक्रम' राबवण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत शहरातील घटस्फोटित, परित्यक्ता, विधवा आणि निराधार महिलांचा

सर्वांगीण विकास, पुनर्वसन, सक्षमीकरण आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्याचे मुख्य उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.



या सर्वेक्षणाद्वारे पात्र एकल महिलांची अचूक माहिती संकलित करून त्यांना विविध शासकीय योजनांचा थेट लाभ मिळवून दिला जाणार आहे. एकल महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देऊन त्यांचे आर्थिक स्वावलंबन व सामाजिक पुनर्वसन सुनिश्चित करण्यात येणार आहे. रविवार ( दि.३०) ही नोंदणीची अंतिम तारीख असल्याचे नगरसेविका रूपाली कांडगे यांनी सांगितले.

नोंदणी फॉर्म व अधिक माहितीसाठी चाकण नगरपरिषदेच्या राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नगरपरिषद क्षेत्रातील सर्व पात्र एकल महिलांनी या सर्वेक्षणात उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन आपली नोंदणी वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन चाकण नगरपरिषदेच्या प्रशासनाने केले आहे. समाजातील एकल महिलांना मुख्य प्रवाहात आणणे आणि त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे ही आमची प्राथमिकता आहे. शहरांमधील सर्व पात्र भगिनींनी ३० ऑगस्टपूर्वी नगरपरिषदेत जाऊन आपली नोंदणी पूर्ण करावी आणि योजनांचा लाभ घ्यावा." - रुपाली कांडगे, सभापती, महिला व बाल कल्याण विभाग, चाकण नगरपरिषद यांनी सांगितले.

## हुतात्मा राजगुरू जयंतीनिमित्त २०० देशी वृक्षांची लागवड

■ **आळंदी (दै. संध्या)**

हुतात्मा शिवराम हरी राजगुरू जयंती तसेच 'रानमळा पॅटर्न'चे प्रणेते निसर्गवासी पी. टी. शिंदे गुरुजी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पर्यावरण जागर प्रतिष्ठान, हुतात्मा शिवराम हरी राजगुरू पत्रकार संघ, खेड तालुका व नेचर फाउंडेशन, आळंदी देवाची यांच्या संयुक्त विद्यमाने माजगाव, चिंबळी येथे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी दोनशे देशी वृक्षप्रजातींची लागवड करण्यात आली.

कार्यक्रमास वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष कंक, विलास कातोरे, मिलिंद शिंदे, श्रीकांत बोरावके, हनुमंत देवकर, भागवत काटकर, अनिल जोगदंड यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

वृक्षांचे मानवी जीवनातील महत्त्व अधोरेखित करताना हनुमंत देवकर यांनी कोरोना काळातील ऑक्सिजनच्या टंचाईची आठवण करून दिली. वृक्षारोपण हा केवळ एक दिवसाचा उपक्रम न राहता सातत्याने वृक्षसंवर्धन झाले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.




मिलिंद शिंदे यांनी आगामी काळात 'एक विद्यार्थी, एक झाड' हा उपक्रम राबविण्याची माहिती दिली. तर भागवत काटकर यांनी वृक्षलागवड व संवर्धनासाठी ठोस धोरणाची गरज व्यक्त केली. उपस्थित मान्यवरांनी वृक्षसंवर्धनाचा संकल्प केला.

## नीरा येथे पैगंबरजयंती उत्साहात साजरी

■ **पुरंदर (दै. संध्या)**

नीरा - पुरंदर तालुक्यातील नीरा येथे पैगंबर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. इस्लाम धर्माचे संस्थापक हजरत मोहंम्मद पैगंबर यांच्या १५०१ व्या जयंती निमित्त स्टेशन मस्जिद, नीराच्या वतीने बुधवारी (दि.२६)भव्य मिरवणूक काढण्यात आली.दरम्यान, जेजुरी पोलिसांसह ग्रामस्थांनी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या.

नीरा (ता.पुरंदर) येथे पैगंबर जयंतीनिमित्त बुधवारी( दि.२६) सालाबादप्रमाणे स्टेशन मस्जिद पासून लोणंदरोड , नगररोड, बुवासाहेब चौक, अहिल्यादेवी चौक, शिवाजी चौक मार्गे पुन्हा लोणंदरोड व मस्जिद पर्यंत अशी हजरत मोहंम्मद पैगंबर यांच्या दर्गाहच्या ' गुंबद-ए- खिजरा' च्या प्रतिकृतीची मिरवणूक काढण्यात आली होती.या मिरवणूकीमध्ये लहान मुलांपासून जेष्ठांपर्यंत नागरिक उपस्थित होते. नार- ऐ- तकबीर , अल्लाहू अकबर , नार - ऐ- रिसालत, या रसुलुल्लाह अशा प्रकारे विविध घोषणा देऊन लहानमुले, तरूणांनी हजरत मोहंम्मद पैगंबर यांच्या विषयी आदर व्यक्त केला.स्टेशन मस्जिदमध्ये महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.



यावेळी पैगंबर जयंतीनिमित्त जेजुरीचे पोलिस निरीक्षक रविंद्र पाटील, सहा.पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर उदार ,पीएसआय रविराज कोकरे यांनी मुस्लिम बांधवांना गुलाबपुष्प देत शुभेच्छा दिल्या तर दत्ताजीराव चव्हाण, अनिल चव्हाण, प्रमोद काकडे, विराज काकडे, दिपक काकडे, अँड.पृथ्वीराज चव्हाण, अनंता शिंदे, कल्याणराव जेधे, सुदाम बंडगर, अरविंद जेधे, महेश जेधे प्रभारी पोलीस पाटील राहुल शिंदे आदींनी गुंबद ए खिजराच्या प्रतिकृतीला पुष्पहार अर्पन करून मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या. मिरवणूकीतील बालचमूंना राजेशभाऊ काकडे सोशल फाऊंडेशनच्यावतीने सरबतचे, विराज काकडे मित्र परिवार तसेच अरविंद जेधे मित्र परिवाराच्या वतीने खाऊचे वाटप करण्यात आले. या वेळी सिकंदर शेख, समीर शेख, हाशिम सय्यद, जावेद शेख, जमीर सय्यद, अलताफ सय्यद, रियाज सय्यद, मोहंम्मदगौस आतार, मुन्ना डांगे, एजाज पठाण, सुरज आतार यांच्यासह बहुसंख्येने मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# शिवलिलामृत पारायण सोहळ्याची भक्तिमय वातावरणात सांगता

■ **जेजुरी (दै. संध्या)**

येथील शिवकालीन ऐतिहासिक व जागृत देवस्थान असलेल्या श्री लवथळेश्वर मंदिरात सालाबादप्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व शिवलिलामृत पारायण सोहळ्याची भक्तिमय वातावरणात सांगता झाली.

या सप्ताहाच्या निमित्ताने मंदिर परिसरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शिवलिलामृत पारायण, प्रवचन, कीर्तन, भजन, जागर तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण लवथळेश्वर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या धार्मिक सोहळ्याचा लाभ घेतला.


सप्ताहाच्या सांगतेपूर्वी श्री लवथळेश्वर मंदिरापासून भव्य दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या महिला व भाविकांनी फुगड्या खेळत, अभंग व हरिनामाचा गजर करत दिंडीमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. ठिकठिकाणी 'ज्ञानोबा-तुकाराम', 'हर हर महादेव' अशा जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. भाविकांनी भक्तिभावाने भंडारा उधळत टाळ-मृदंगाच्या गजरात दिंडीची शोभा वाढवली.

या संपूर्ण सोहळ्यामुळे लवथळेश्वर मंदिर परिसरात भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. हरिनामाचा गजर, टाळ-मृदंगाचा निनाद आणि 'हर हर महादेव'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. हा धार्मिक सोहळा यशस्वी पार पाडण्यासाठी ह.भ.प. शंकर महाराज म्हस्के, संतोष बयास, सचिन बयास, हनुमंत बयास, ऋषिकेश जगताप, नगरसेवक रमेश लेंडे,पोपट पवार,उदय नवले, चंद्रकांत निंबाळकर ,विजय कुंभार, दिलीप थोरात,मोहन कुतवळ,पुनमदास वैष्णव, विनायक बेलसरे, हरिश्चंद्र कराळे , राजेंद्र भोंगळे, शंकर पवार,व सर्व महिला भगिनी आदिंनी परीश्रम घेतले






दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



## थोडक्यात पण महत्त्वाचे



### तीव्र रक्तक्षयग्रस्त गरोदर मातांच्या उपचारांना गती मिळणार

मुंबई : गर्भधारणा हा स्त्रीच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असून योग्य आहार व देखरेखीद्वारे माता व नवजात शिशुचे आरोग्य राखणे आवश्यक आहे. भारतात अंदाजे ५२ टक्के गर्भवती महिलांमध्ये रक्तक्षय आढळून येतो. रक्तक्षयामुळे प्रसूतीदरम्यान/नंतर मातेच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. तीव्र रक्तक्षय हे माता व नवजात शिशुंच्या मृत्यूचे एक महत्त्वाचे कारण आहे. हीच समस्या दूर करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार २०१५ मध्ये आरोग्य विभागाला आयर्न सुक्रोजच्या माध्यमातून ॲनिमियावरील उपचार राबविण्याचे निर्देश दिले होते. यामुळे राज्यातील गरोदर मातांचे आरोग्य अधिक सक्षम करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनात विभागाने तीव्र रक्तक्षयावरील मोफत उपचारांना गती दिली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रांपर्यंतच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत आयर्न सुक्रोजचा सिद्ध आणि परिणामकारक उपचार पोहोचविण्यावर मुख्यमंत्र्यांनी भर दिला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण तसेच दुर्गम भागातील गरोदर मातांनाही तीव्र रक्तक्षय विशेष उपचार सुविधा उपलब्ध होण्यास मदत झाली आहे. मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली मातृ व बाल आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देत राज्य शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग कार्यरत आहे. तीव्र रक्तक्षयग्रस्त गरोदर मातांना वेळेत उपचार, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि सक्षम आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या या प्रयत्नांमुळे सुरक्षित मातृत्वाचा पाया अधिक भक्कम होत आहे.

### पर्यटकांनी जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्राशी संपर्क साधावा

नांदेड : नेपाळमधील रसुवा जिल्ह्यात भोटे कोशी नदीला आलेल्या पूरस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, या आपत्तीच्या पार्श्वभूमीवर विविध देशांतील पर्यटक व नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत माहिती संकलित करण्याचे काम सुरू आहे. या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्यातील जे पर्यटक सध्या नेपाळमध्ये असून पूरस्थितीमुळे अडकले आहेत किंवा ज्यांचा त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क होत नाही, त्यांनी अथवा त्यांच्या नातेवाईकांनी तात्काळ जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे. यासाठी खालील क्रमांकांवर संपर्क साधता येईल : जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्र, नांदेड 02462-235077 1077 (टोल फ्री) नेपाळमध्ये अडकलेल्या पर्यटकांची माहिती प्रशासनाला देताना संबंधित व्यक्तीचे नाव, मोबाईल क्रमांक, नेपाळमधील सध्याचे ठिकाण/हॉटेल, प्रवासाचा तपशील आणि कुटुंबीयांचा संपर्क क्रमांक उपलब्ध असल्यास तो द्यावा. नांदेड जिल्ह्यातील नागरिकांनी घाबरून न जाता अधिकृत माहितीसाठी जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधावा. आपत्तीग्रस्त भागातील नागरिक व पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती माहिती व समन्वय साधण्याचे प्रयत्न प्रशासनामार्फत करण्यात येत आहेत.

### प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक चर्चा

मुंबई : हाफकिन महामंडळातील कर्मचाऱ्यांना 'सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना' लागू करणे आणि महामंडळाचे अद्ययावतीकरण करण्यासंदर्भात सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती विधानपरिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांनी दिली. हाफकिनच्या कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर उपसभापती सचिन अहिर यांच्या अध्यक्षतेखाली आणि अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत विधान भवनात नुकतीच एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला अन्न व औषध प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय खंदारे, वित्त विभागाचे अवर सचिव क. ति. बडगुजर, हाफकिनचे अतिरिक्त व्यवस्थापकीय संचालक रमेश चव्हाण आणि कर्मचारी शिष्टमंडळाचे प्रतिनिधी उपस्थित होते.



# महाराष्ट्राच्या 'ग्रोथ इंजिन'ला 'एमएसएमई' क्षेत्राची ताकद मिळणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : ४९ 'एमएसएमई'च्या सामंजस्य करारातून २,३२० कोटींची गुंतवणूक प्रस्तावित

**मुंबई (दै. संध्या)**

चाकण-भोसरीच्या औद्योगिक पट्ट्याला नवी ऊर्जा देणाऱ्या ४९ सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसोबतच्या (एमएसएमई) सामंजस्य कराराच्या माध्यमातून २ हजार ३२०.९७ कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित आहे. या गुंतवणुकीतून उत्पादनक्षमता वाढण्यासोबतच हजारो रोजगारांच्या नव्या संधी निर्माण होतील आणि ग्रोथ इंजिन असणाऱ्या पुणे परिसरातील औद्योगिक परिसंस्थेला आणखी बळ मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सह्याद्री अतिथीगृह येथे हा कार्यक्रम झाला. यावेळी उद्योग (गुंतवणूक व सेवा विभाग) आणि मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अनबलगन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्र सिंह कुशवाह, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, उद्योग विभागाचे अवर सचिव विनोद मेंढे, आयुक्त (एमएसएमई) प्रेरणा देशभ्रतार, विशेष आयुक्त (मैत्री) वैभव वाघमारे तसेच वरिष्ठ अधिकारी आणि कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

महाराष्ट्र हे देशाचे 'ग्रोथ इंजिन' असून, देशाच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासात राज्याची भूमिका महत्त्वाची आहे. मोठ्या उद्योगांसाठी आवश्यक घटक, सुटे भाग, सेवा आणि विविध उत्पादनांचा पुरवठा करण्याबरोबरच स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीत एमएसएमई क्षेत्राचा मोठा वाटा आहे. त्यामुळे मोठ्या उद्योगांच्या विस्तारामागे एमएसएमई क्षेत्र मजबूत आधारस्तंभ म्हणून उभे आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### प्रत्यक्ष उत्पादनाची गती मिळेल

सामंजस्य करार झालेल्या ४९ 'एमएसएमई' उद्योगांना आवश्यक जमीन, पायाभूत सुविधा आणि इतर सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी उद्योग विभाग आणि एमआयडीसी वेगाने कार्यवाही करणार आहेत. संबंधित उद्योगांनी एक ते दोन वर्षांत उत्पादन सुरू करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यामुळे या गुंतवणुकीचा लाभ प्रत्यक्ष उत्पादन, रोजगार, व्यवसायाच्या संधी आणि स्थानिक पुरवठा साखळीच्या विस्तारातून दिसून येईल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पुणे आणि परिसरातील ऑटोमोबाईल व अभियांत्रिकी उद्योगांच्या परिसंस्थेत एमएसएमई उद्योगांची भूमिका महत्त्वाची आहे. अनेक उद्योग आपल्या घटकांची आणि सेवांची मोठ्या प्रमाणावर स्थानिक एमएसएमईकडून खरेदी करतात. अनेक उत्पादनांच्या आयातीला पर्याय निर्माण करून 'लोकल टू ग्लोबल' वाटचालीला चालना देण्याचे काम एमएसएमई क्षेत्र करत आहे. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाच्या वाटचालीत आज आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला.

'एमएसएमई' क्षेत्राचा नियोजनबद्ध आणि वेगवान विकास करण्यासाठी राज्य शासनाने स्वतंत्र व्यवस्था उभारली आहे. राज्यातील 'एमएसएमई' उद्योगांची संख्या, स्वरूप, रोजगारनिर्मिती, उत्पादनक्षमता आणि गरजा यांचा अचूक आढावा घेण्यासाठी 'एमएसएमई सेन्सस' करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या माहितीच्या आधारे अधिक परिणामकारक धोरणे आणि सुविधा निर्माण करता येतील, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

परकीय थेट गुंतवणूक, उद्योग, उत्पादन, स्टार्टअप्स आणि विविध औद्योगिक क्षेत्रांत महाराष्ट्राने देशात आपले अग्रस्थान कायम राखले आहे. उद्योजकांना अधिक चांगल्या सुविधा, सक्षम पायाभूत व्यवस्था आणि उद्योगस्नेही वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

राज्यातील अनेक औद्योगिक वसाहती ३० ते ४० वर्षांपूर्वी विकसित झाल्या असून, बदलत्या काळानुसार त्यांच्या पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण आवश्यक आहे. या वसाहतींना 'औद्योगिक नगरी'चा दर्जा देऊन स्वतंत्र प्रशासन व्यवस्था निर्माण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. स्थानिक करातूनच प्रशासन, स्वच्छता आणि पायाभूत सुविधांचा विकास करण्याची संकल्पना यामागे आहे.

# सरला बेटाचा प्रमुख तीर्थस्थळ म्हणून विकास करणार

**शिर्डी (दै. संध्या)**

तीर्थस्थळ म्हणून सरला बेटाच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात येत असून सर्व विकासकामे पूर्ण झाल्यावर सरला बेट महाराष्ट्रातील भाविकांसाठी आध्यात्मिक ऊर्जा केंद्र असेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. सरला बेट विकासाचा आराखड्याच्या माध्यमातून सभागृह, रस्ते, पूरसंरक्षण आणि सौरऊर्जा यासह विविध कामे सुरू करण्यात आली असल्याची माहितीही त्यांनी दिली.

अखंड हरिनाम सप्ताहाच्या काल्याच्या कीर्तनानिमित्त आयोजित सोहळ्यात मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार विठ्ठल लंघे, अमोल खताळ, आशुतोष काळे, विवेक कोल्हे, वैजापूरचे आमदार रमेश बोरनारे, महंत रामगिरी महाराज, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे आदी उपस्थित होते.



सदगुरू योगीराज गंगागिरी महाराजांनी सुरू केलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या परंपरेचा उल्लेख करून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, सरला बेटावर या ठिकाणाहून समाजाला विचार आणि प्रेरणा मिळते. हरिनाम संकीर्तनामुळे दुःखाचे हरण होते, मनातील 'मी'पणा दूर होतो आणि जातीभेद विसरून सर्वजण एकत्र येतात. प्रत्येकामध्ये विठ्ठलाचे दर्शन घेण्याची भावना निर्माण होते. आजच्या जगामध्ये हरिनाम संकीर्तन समाजाला एकत्र आणणारा आणि जीवनाला सकारात्मक दिशा देणारा मोठा उपाय आहे.

भारताची संस्कृती आणि सभ्यता जगातील सर्वात जुनी असून, हजारो वर्षांपासून या भूमीवर सनातन विचार, संस्कार आणि आध्यात्माची परंपरा अखंड सुरू आहे. अनेक आक्रमणे झाली तरी आपल्या विचारांना, संस्कारांना आणि श्रद्धेला कोणीही बदलू शकले नाही. वारकरी परंपरा, गुरु परंपरा आणि हरिनामाच्या शक्तीमुळे ही संस्कृती अखंड राहिली, असे मुख्यमंत्री म्हणाले.

हरिनाम संकीर्तनात शेतकरी बांधव सहभागी होत असल्याचा उल्लेख करतांना मुख्यमंत्री म्हणाले, शेतकरी, वारकरी, शेतमजूर आणि समाजातील वंचित घटाकांच्या विकासासाठी शासन प्रयत्न करीत आहे. शेतकरी हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने शेतकऱ्यांना दिलेला कर्जमाफीचा शब्द पूर्ण करत साडेबारा लाख शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये आतापर्यंत कर्जमाफीची रक्कम जमा करण्यात आली असून, ५६ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा उपक्रम सुरू आहे. दर पंधरा दिवसांनी नवीन पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करून त्यांच्या खात्यात रक्कम जमा केली जात आहे.

शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, सध्या ७५ टक्के शेतकऱ्यांना दिवसा आठ तास वीज मिळत आहे. टप्प्याटप्प्याने १०० टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यात येईल. पुढील काळात वर्षभार १२ तास मोफत वीज देण्याचा निर्धाही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

# सर्वांगीण विकासासाठी विविध यंत्रणांनी समन्वयाने काम करावे : उपमुख्यमंत्री

**मुंबई (दै. संध्या)**

विविध समस्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी सर्व संबंधित शासकीय यंत्रणा आणि संस्थांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. चाकणच्या विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीने कामाचा रोडमॅप तयार केला असून, समितीला आवश्यक त्या सूचना व मागण्या ऐकून घेऊन काम करण्यास पूर्ण सहकार्य केले जाईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज केले.

शासकीय विश्रामगृह येथे उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांनी चाकण परिसरातील विविध प्रश्न तसेच चाकणच्या सर्वांगीण विकासासाठी गठित उच्चस्तरीय समितीच्या कामकाजाचा आढावा घेतला. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी खेड-आळंदीचे आमदार बाबाजी काळे, उपमुख्यमंत्री महोदयांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पीएमआरडीए आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या, चाकणच्या समस्या सोडविण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणा एकाच व्यासपीठावर आल्या असून, ही सकारात्मक बाब आहे. समितीच्या माध्यमातून विविध प्रश्नांचा सखोल अभ्यास करून त्यावर टप्प्याटप्प्याने कार्यवाही करण्यात येत आहे. चाकण परिसरातील वाढती लोकसंख्या, औद्योगिक विस्तार आणि वाहतुकीचे वाढते प्रमाण लक्षात घेता सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्याची आवश्यकता आहे. यासाठी तातडीने १०० सुरक्षा कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याची कार्यवाही करण्यात येत असून, आवश्यकतेनुसार नवीन पोलिस ठाणी उभारण्याबाबतही कार्यवाही सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. चाकण हे मोठे औद्योगिक केंद्र असून देश-विदेशातून अनेक नागरिक व उद्योजक येथे येतात.

# प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेत देशात महाराष्ट्राची दमदार कामगिरी

**नवी दिल्ली(दै. संध्या)**

शेतमालाचे मूल्यवर्धन, रोजगारनिर्मिती आणि महिला उद्योजकतेला चालना देणाऱ्या प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेची प्रभावी अंमलबजावणी करत महाराष्ट्राने देशातील मोठ्या राज्यांच्या श्रेणीत अव्वल कामगिरी केली आहे. या उल्लेखनीय कामगिरीची राष्ट्रीय स्तरावर दखल घेत महाराष्ट्राला 'सर्वोत्तम कामगिरी करणारे राज्य' या राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले. केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री चिराग पासवान यांच्या हस्ते राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

नवी दिल्लीतील इंडिया हॅबिटॅट सेंटर येथे आयोजित दोन दिवसीय 'प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेबाबत आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या समारोप सोहळ्यात पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी कृषी प्रक्रिया व नियोजन विभागाचे संचालक विनायक कुमार आवटे, राज्य प्रकल्प व्यवस्थापक अमोल चिद्रावार, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी, अहिल्यानगरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बाळासाहेब बोराळे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

केंद्र शासनाने निश्चित केलेल्या विविध कामगिरी निकषांवर महाराष्ट्राने उल्लेखनीय यश मिळविले आहे. योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकरी, महिला बचत गट आणि नवउद्योजकांना अन्न प्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी प्रोत्साहन मिळत असून, स्थानिक पातळीवर रोजगार आणि उद्योगनिर्मितीला चालना मिळत आहे.




राज्यात 2021-22 पासून राबविण्यात येत असलेल्या या योजनेअंतर्गत आतापर्यंत 31 हजार 746 प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. यापैकी 17 हजार 786प्रकल्प महिला उद्योजकांचे असून, मंजूर प्रकल्पांमध्ये महिलांचा सहभाग तब्बल 56 टक्के आहे. अन्न प्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या दिशेने महाराष्ट्राने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे.


या योजनेमुळे राज्यातील सूक्ष्म अन्न प्रक्रिया क्षेत्राला मोठी आर्थिक गती मिळाली आहे. मंजूर प्रकल्पांमधून 2.64 लाख प्रत्यक्ष आणि 7.92 लाख अप्रत्यक्ष, असे एकूण 10.56 लाख मनुष्यदिन रोजगार निर्माण झाले आहेत. योजनेअंतर्गत राज्यात सुमारे 3 हजार 135 कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असून, सुमारे 18 लाख मेट्रिक टन प्रक्रिया क्षमता निर्माण झाली आहे. लाभार्थ्यांना आतापर्यंत 715 कोटी रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले आहे.

तृणधान्ये, कडधान्ये, मसाले, फळे, भाजीपाला, दुग्धजन्य पदार्थ आणि तेलबिया अशा विविध कृषी उत्पादनांवर आधारित प्रक्रिया उद्योगांना या योजनेचा लाभ मिळत आहे. शेतमालावर प्रक्रिया करून त्याचे मूल्यवर्धन करण्याबरोबरच स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचे काम योजनेच्या माध्यमातून होत आहे. यामुळे शेतकरी ते उद्योजक आणि उत्पादन ते बाजारपेठ अशी संपूर्ण मूल्यसाखळी अधिक सक्षम होत असून, ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळत आहे. स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती आणि उद्योगांना चालना मिळाल्याने ग्रामीण भागातील आर्थिक व्यवहारांनाही वेग आला आहे.

ग्रामीण आणि शहरी उपजीविका अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीतही महाराष्ट्राने देशातील मोठ्या राज्यांच्या श्रेणीत सर्वोत्तम कामगिरी केली आहे. राज्य ग्रामीण उपजीविका अभियानासाठी राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीधर दुबे पाटील आणि अश्विनी अकुसकर यांनी पुरस्कार स्वीकारला. तर राज्य शहरी उपजीविका अभियानाचा पुरस्कार सहआयुक्त नूतन खाडे आणि राज्य अभियान व्यवस्थापक प्रसाद राजेभोसले यांनी स्वीकारला. ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांसाठी शाश्वत उपजीविकेच्या संधी निर्माण करण्याच्या राज्याच्या प्रयत्नांना या पुरस्कारांमुळे राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेच्या जिल्हास्तरीय प्रभावी अंमलबजावणीत उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल छत्रपती संभाजीनगरचे जिल्हा नोडल अधिकारी दीपक कृष्णा गवळी आणि अहिल्यानगरचे जिल्हा नोडल अधिकारी सुधाकर बाळासाहेब बोराळे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. उद्योजकांना मार्गदर्शन, प्रकल्पांना चालना आणि योजनेचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचविण्यात त्यांच्या योगदानाची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली.







## थोडक्यात पण महत्वाचे



### प्रा. सुभाष जगताप यांचे कार्य विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक व प्रेरणादायी : प्रा. मिलिंद जोशी

**पुणे : दैनिक संध्या**

तळेगाव दाभाडे येथील इंद्रायणी महाविद्यालयातील विद्यार्थीप्रिय प्राध्यापक सुभाष जगताप यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि विद्यार्थीहिताच्या कार्याचा गौरव करणाऱ्या 'परिस स्पर्श' या स्मरणिकेचे प्रकाशन पुण्यातील पत्रकार भवन, नवी पेठ येथे उत्साहात पार पडला. फ्रेंड्स अकॅडमी माजी विद्यार्थी समिती, सासवड आणि इंद्रायणी महाविद्यालय माजी विद्यार्थी संघटना, तळेगाव दाभाडे यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ साहित्यिक तथा महाराष्ट्र साहित्य परिषदेचे माजी अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ज्येष्ठ पत्रकार आणि दैनिक 'सकाळ'चे माजी संपादक मल्हार अरणकल्ले यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. यावेळी प्रा. मिलिंद जोशी यांनी बदलत्या शिक्षणव्यवस्थेवर भाष्य करताना शिक्षक आणि प्राध्यापकांची भूमिका केवळ अध्यापनापुरती मर्यादित राहता कामा नये, असे मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, त्यांना योग्य दिशा देणे, संस्कार व मूल्यांची जडणघडण करणे आणि त्यांच्या भवितव्याची जबाबदारी स्वीकारणे ही शिक्षकांची खरी भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. "या संदर्भात प्रा. सुभाष जगताप यांचे कार्य आदर्शवत आहे. विद्यार्थ्यांशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण करून त्यांना ज्ञानासोबत संस्कार, मूल्ये आणि जीवनदृष्टी देण्याचे काम त्यांनी केले आहे. त्यामुळे ते केवळ शिक्षक नसून विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक आणि प्रेरणास्थान आहेत," असे गौरवोद्गार प्रा. जोशी यांनी काढले. प्रा. सुभाष जगताप यांनी आपल्या मनोगतातून शैक्षणिक प्रवासातील जुन्या आठवणींना उजाळा दिला. विद्यार्थ्यांसोबतच्या विविध आठवणी सांगताना त्यांनी विद्यार्थ्यांशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्याचा आवर्जून उल्लेख केला. आपल्या यशामध्ये विद्यार्थ्यांचे प्रेम, सहकार्य आणि विश्वास यांचा मोठा वाटा असल्याचे त्यांनी सांगितले. माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन केलेल्या सन्मानाबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. तसेच विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे कौतुक करून त्यांना भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष मल्हार अरणकल्ले यांनीही प्रा. सुभाष जगताप यांच्यासोबतच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. जगताप यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलू उलगडताना त्यांनी अनेक रंजक किस्से सांगून उपस्थितांची मने जिंकली. प्रा. जगताप यांच्या कार्याचे आणि त्यांच्या स्वभावातील आपलेपणाचे कौतुक करत अरणकल्ले यांनी त्यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. 'परिस स्पर्श' ही स्मरणिका वेदांतश्री प्रकाशनाच्या माध्यमातून प्रकाशित करण्यात आली. याप्रसंगी वेदांतश्री प्रकाशनचे संपादक सुनील उंब्रजकर, ग्रामीण कथाकार बबन पोतदार, प्राचार्य रावसाहेब जाधव यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, माजी विद्यार्थी आणि हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणेश धोत्रे यांनी केले. आभार कैलास राऊत यांनी मानले, तर सूत्रसंचालन वर्षा पुरंदरे बालगोपाल यांनी केले.



### इन्स्टाग्रामवरील "आभासी भाईगिरी" पडली महागात;

**कान्हाटी : दैनिक संध्या**

सोशल मीडियावर लाईक्स, व्ह्यूज आणि फॉलोअर्स मिळवण्यासाठी हातात घातक शस्त्रे घेऊन 'रील' (Reel) बनवणाऱ्या आणि समाजात दहशत निर्माण करू पाहणाऱ्या प्रवृत्तींवर पुणे ग्रामीण पोलिसांनी (सुपा पोलीस ठाणे) कायदेशीर बडगा उगारला आहे. पोलिसांच्या 'सायबर पेट्रोलिंग' पथकाने इंस्टाग्रामवरील एका प्रक्षोभक व्हिडिओची गंभीर दखल घेत एका तरुणावर शस्त्रास्त्र कायद्यासह गंभीर कलमांन्वये थेट गुन्हा दाखल केला आहे. सुपा पोलीस ठाण्याचे 'सायबर मॉनिटरिंग' पथक गस्तीवर असताना, दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी 'prem_jagtap_0295' या इंस्टाग्राम अकाउंटवरून एक व्हिडिओ प्रसारित झाल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. या व्हिडिओमध्ये बाबुर्डी (ता. बारामती) येथील रहिवासी प्रेम प्रताप जगताप याने पिस्तूल सदृश्य वस्तू हातात घेऊन व्हिडिओ पोस्ट केल्याचे आढळून आले. सदर व्हिडिओवर "आलीशान युवा प्रतिष्ठान" असा मजकूर टाकून, "शांत है इसका मतलब ये नही की हम संत है..! जंगल अपना है, और कानुन भी अपना है" अशी प्रक्षोभक व धमकीवजा वाक्ये वापरण्यात आली होती. तसेच, या व्हिडिओच्या ऑडिओमध्ये एखाद्या व्यक्तीवर हल्ला केल्याचा संदर्भ देऊन सर्वसामान्य नागरिकांमध्ये जाणीवपूर्वक भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. सध्या पुणे ग्रामीण जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मा. जिल्हादंडाधिकारी यांचे शस्त्रबंदी व जमावबंदीचे आदेश लागू आहेत. या आदेशाचे जाणीवपूर्वक उल्लंघन करून दहशत निर्माण केल्याप्रकरणी, सुपा पोलिसांनी स्वतःहून फिर्याद देत इंस्टाग्राम अकाउंट धारक आरोपी प्रेम जगताप याच्याविरुद्ध कारवाईचा बडगा उगारला आहे. सदर तरुणावर भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ चे कलम ३५१(२)(३), २२३, तसेच भारतीय शस्त्र कायदा कलम ३(२५) आणि महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) व १३५ अन्वये अत्यंत कडक गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### भटक्या कुत्र्यांना पकडून नेण्यासाठी पथकं स्थापन करण्याची मागणी

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील भटकी कुत्र्यांची मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असून खुद्द आयुक्त डॉ विजय सूर्यवंशी ह्यांनी भटक्या कुत्र्यांना पकडून नेण्यासाठी पथकं स्थापन केले आहे म्हणून सोशल मीडिया वर व्हिडिओ प्रसारित केला होता तसेच त्या संदर्भात कारवाई करण्यात येईल म्हणून जाहीर आश्वासन दिले होते आता महानगरपालिका मुख्य दरवाजाच्या बाहेरील बाजूस भटकी कुत्री मुक्काम करत असून त्या संदर्भात पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ विजय सूर्यवंशी ह्यांनी ताबडतोब दखल घेऊन आरोग्य अधिकारी ह्यांच्या विरोधात निलंबन कारवाई करण्यात यावी चक्क महानगरपालिका भवन इमारत मध्ये भटकी कुत्री मुक्काम करत असून त्या संदर्भात पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ विजय सूर्यवंशी गप्प बसले आहेत तर दुसरीकडे शहरातील भटक्या कुत्र्यांना पकडून नेण्यासाठी पथकं स्थापन केली जात असून त्या भटक्या कुत्र्यांना पकडून त्यांच्यावर उपचार करुन कायमस्वरूपी उपाययोजना करुन त्यांना निर्जन स्थळी हलविण्यात यावे जेणेकरून नागरिकांना विनाकारण त्रास सहन करावा लागणार नाही ह्याची दक्षता घ्यावी ही नम्र विनंती सचिन काळभोर भारतीय जनता पार्टी कार्यकर्ता पिंपरी चिंचवड शहर यांनी केली आहे.

# सुरक्षित, गुणवत्तापूर्ण व पर्यावरणपूरक बांधकाम पद्धती विकसित व्हावी : बडवे



■ पुणे (दै. संध्या)

शेतीनंतर मानवी जीवनातील सर्वात मोठा आणि महत्त्वाचा व्यवसाय असलेले बांधकाम क्षेत्र प्राचीन आणि समृद्ध आहे. प्रदीर्घ काळापासून मानवाने स्वतःसाठी निवारा निर्माण करण्यापासून या क्षेत्राची सुरुवात झाली आहे. आधुनिक काळात या क्षेत्रात सिमेंट, कंक्रीट, लिफ्ट्स, एस्कलेटर यांसारखे नवनवीन शोध व तंत्रज्ञान आले असून या क्षेत्राचे महत्त्व अतोनात वाढले आहे. बदलत्या काळानुसार बांधकाम क्षेत्रात सुरक्षित, गुणवत्तापूर्ण व पर्यावरणपूरक बांधकाम पद्धती विकसित व्हावी," असे मत प्रख्यात वास्तुरचनाकार आर्कि. व्ही. व्ही. बडवे यांनी व्यक्त केले.

पुणे कन्स्ट्रक्शन इंजिनिअरिंग रिसर्च फाऊंडेशनच्या (पीसीईआरएफ) ४३ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बडवे बोलत होते. शिवाजीनगर येथील हॉटेल तरवडे क्लार्क्स इन येथे आयोजित कार्यक्रमावेळी 'पीसीईआरएफ'चे अध्यक्ष इंजि. नरेंद्र कोठारी, सचिव आर्कि. शिरीष केंभावी, ज्येष्ठ सदस्य अशोक बेहरे, वामनराव कुलकर्णी, जयंत इनामदार आदी उपस्थित होते. यावेळी 'पीसीईआरएफ'तर्फे जे. पी. श्रॉफ, विश्वास लोकरे, संजय वायचळ, श्रीकांत निवसरकर आदींचा सन्मान करण्यात आला. बांधकाम क्षेत्रातील अग्रगण्य असणाऱ्या 'कॉन्स्ट्रो २०२७' आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाची घोषणा करण्यात आली. तसेच हैदराबाद येथील 'हिटेक्स एक्झिबिशन सेंटर' येथे होणाऱ्या 'कॉन्स्ट्रो' प्रदर्शनासाठी हायबीज संस्थेसोबत सामंजस्य करार करण्यात आला.

बांधकाम क्षेत्राच्या विकासाबरोबरच कामगारांची सुरक्षितता आणि पर्यावरणाचे संरक्षण यांनाही समान महत्त्व दिले पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सुरक्षित, गुणवत्तापूर्ण आणि पर्यावरणपूरक बांधकाम पद्धती विकसित करण्याची गरज आहे. संशोधनातून निर्माण होणारे ज्ञान प्रत्यक्ष बांधकाम क्षेत्रात पोहोचले, तर भविष्यातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम, टिकाऊ आणि सुरक्षित होतील, असेही बडवे यांनी नमूद केले.

नरेंद्र कोठारी म्हणाले की, 'कॉन्स्ट्रो'सारख्या उपक्रमांमधून नवीन तंत्रज्ञान प्रत्यक्ष क्षेत्रापर्यंत पोहोचण्यास आणि त्याचा प्रभावी वापर करण्यास मदत होते. हे प्रदर्शन हे केवळ नवीन उत्पादने आणि तंत्रज्ञान दाखविण्याचे माध्यम नसून ज्ञानाची देवाणघेवाण आणि अनुभवांची सांगड घालणारे प्रभावी व्यासपीठ आहे. भारताच्या पायाभूत विकासाला गती देण्यासाठी अशा ज्ञानाधारित उपक्रमांची भूमिका महत्त्वाची आहे."

आर्कि. शिरीष केंभावी म्हणाले, "पुणे कन्स्ट्रक्शन इंजिनिअरिंग रिसर्च फाऊंडेशनची स्थापना १९८३ मध्ये झाली. नवीन साहित्य, पद्धती व तंत्रज्ञानाची माहिती पोहोचविण्यासह कौशल्य विकासाला चालना देणे हा संस्थेचा उद्देश आहे. 'कॉन्स्ट्रो', 'स्टुडंट अवॉर्ड्स', 'युकॉन्स' आणि 'सेफ्टी अवॉर्ड्स'च्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांचे सहा-सात प्रकल्प पेटंटच्या अंतिम टप्प्यात असून, बांधकाम क्षेत्राच्या प्रगतीसोबतच सुरक्षा, संशोधन आणि नव्या तंत्रज्ञानाला प्राधान्य देणे आवश्यक आहे." 'पीसीईआरएफ'च्या पाठिंब्यामुळे कॉन्स्ट्रो प्रदर्शन हैदराबादमध्ये आयोजित केले जात आहे. बांधकाम क्षेत्रातील उद्योजक, व्यावसायिक आणि तंत्रज्ञांसाठी हे एक मोठे व्यासपीठ ठरेल, असा विश्वास हायबीजच्या व्यवस्थापकीय संचालिका डॉ. संध्या राणी यांनी नमूद केले.

## पिंपळवंडी घटनेविरोधात शिक्षक समितीचा तीव्र निषेध



■ नारायणगाव(दै. संध्या)

पिंपळवंडी येथे एका दहा वर्षांच्या चिमुरडीवर झालेल्या अमानुष अत्याचार आणि तिच्या हत्येच्या घटनेमुळे संपूर्ण परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या अमानवी कृत्याचा निषेध करण्यासाठी जुन्नर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील सर्व शिक्षकांनी काळ्या फिती लावून आपला तीव्र निषेध नोंदवला.

या प्रसंगी शाळांमध्ये सकाळच्या परिपाठाच्या वेळी त्या लहान मुलीस सर्व शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी श्रद्धांजली अर्पण केली. तसेच, शिक्षकांनी उपस्थित विद्यार्थ्यांना अशा घटनांविषयी जागरूक करत योग्य मार्गदर्शन केले व त्यांचे उद्बोधन केले.

शिक्षक समितीचे प्रतिनिधी बाळासाहेब लांघी आणि त्यांच्या सहकारी शिक्षकांनी प्रशासनाकडे आणि समाजाकडे आपली तीव्र भावना व्यक्त केली आहे. या अत्यंत घृणास्पद आणि क्रूर घटनेला जो नराधम कारणीभूत आहे, त्याला कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे आणि त्याला थेट फाशीचीच शिक्षा देण्यात यावी, अशी आक्रमक मागणी शिक्षकांकडून सर्व स्तरातून केली जात आहे. या निषेध आंदोलनात शिक्षक समितीचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने शिक्षक वृंद सहभागी झाला होता.

## निळू फुले स्मृती कलागौरव पुरस्कार जाहीर

■ पुणे (दै. संध्या)

विश्वकर्मा प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा निळू फुले स्मृती कलागौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. यंदा पुरस्काराचे १८ वे वर्ष असून प्रसिद्ध कीर्तनकार, ज्येष्ठ संपादक, संविधान दिंडीचे संचालक आणि वारकरी सेवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर आणि महिला बचत गटाच्या अध्यक्षा, उपेक्षितांच्या शिक्षण हक्कासाठी कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या मनीषा सुतार यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. प्रसिद्ध लेखक अनिल गुंजाळ यांच्या 'नापासातील कोहिनूर' या पुस्तकात सुतार यांच्या कार्याची यशोगाथा अधोरेखित करण्यात आली आहे.

सिनेअभिनेत्री गार्गी फुले यांच्या शुभहस्ते आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या अध्यक्षतेखाली या पुरस्कारांचे वितरण होणार आहे. सन्मानचिन्ह, 'लेक वाचवा राष्ट्र वाचवा' या विष्णू गरुड लिखित संहितेचा सन्मान असे पुरस्काराचे स्वरूप आहे. या कार्यक्रमाला प्रा. डॉ. गौतम मगरे आणि चंद्रकांत गवळी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

पुरस्कार सोहळा दि.२८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ४ वाजता, एस. एम. जोशी फाऊंडेशन, नवी पेठ, कॉन्फरन्स हॉल (पहिला मजला) येथे होणार आहे. याबाबतची माहिती संस्थापक अध्यक्ष विष्णू गरुड यांनी पत्रकार परिषदेत दिली. या वेळी कैलास बिरामणे, रवींद्र रायकर, शरद कुंभार, इब्राहीम यवतमाळकर, सज्जाद खतीब आदी उपस्थित होते.

## पिंपळवंडी घटनेतील पीडित कुटुंबाला मनोधैर्य योजनेतून आर्थिक दिलासा

■ नारायणगाव :(दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी गावात लैंगिक अत्याचार करून साडेनऊ वर्षांच्या बालिकेचा खून करण्यात आल्याची दुर्दैवी घटना १८ ऑगस्टला घडली होती. या बालिकेच्या कुटुंबीयांना 'मनोधैर्य योजने'अंतर्गत दहा लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली.

पुणे न्यायालयाच्या नवीन प्रमुख जिल्हा, सत्र न्यायाधीश आणि पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा अंजू शेंडे यांनी सोमवारी पदभार स्वीकारला. कामकाजाच्या पहिल्या दिवशी त्यांनी जुन्नरमधील घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने बैठक आयोजित करण्याचे आदेश दिले. त्यानंतर त्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली.

विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव, न्यायाधीश रेवती देशपांडे या वेळी उपस्थित होत्या. या प्रकरणातील सर्व कागदपत्रांची पडताळणी करून आर्थिक मदतीचा निर्णय घेण्यात आला. गुन्हा घडल्यानंतर सात दिवसांच्या आत पीडितेच्या आई-वडिलांना आर्थिक मदत देण्याचा निर्णय पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने घेतला.

या प्रकरणी आरोपीविरोधात आळेफाटा पोलिस ठाण्यात लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कायदा (पोक्सो) आणि खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला ३१ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. 'बलात्कार, लैंगिक अत्याचार, ॲसिड हल्ल्यातील पीडितांना, तसेच त्यांच्या कुटुंबीयांना राज्य शासनाच्या 'मनोधैर्य योजने'अंतर्गत आर्थिक मदत दिली जाते.

## वळसे पाटलांनी घेतली पीडित कुटुंबाची भेट

■ नारायणगाव(दै. संध्या)



पिंपळवंडी येथील चिमुकलीवर अत्याचार करून हत्या केल्याच्या दुर्दैवी घटनेनंतर माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी पीडित कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने पीडित कुटुंबाला ५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची घोषणा त्यांनी केली.

वळसे पाटील हे माजी आमदार अतुल बेनके यांच्यासह घटनास्थळी दाखल झाले. आरोपीला कठोरात कठोर शिक्षा मिळावी, यासाठी तपासाला गती देऊन १५ दिवसांत आरोपपत्र दाखल करण्याच्या सूचना पोलिसांना देण्यात आल्याचे वळसे पाटील यांनी सांगितले. न्यायालयीन लढ्यासाठी सक्षम वकील उपलब्ध करून देण्याबाबतही योग्य त्या सूचना देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पीडित कुटुंब आर्थिक अडचणीत असून, त्यांना या संकटातून बाहेर काढणे, तसेच कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाला मदत करणे हे प्राधान्य राहील. आदिवासी प्रकल्पाच्या माध्यमातून उपलब्ध योजनांचा लाभही कुटुंबाला मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे वळसे पाटील यांनी सांगितले.

अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी समाजात मोठ्या प्रमाणावर जनजागृती करणे आवश्यक आहे. गावातील सुरक्षाव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी पोलिसांनी सतर्कता वाढवावी, अशा सूचनाही संबंधितांना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी माजी आमदार बेनके यांनीही भावना व्यक्त केल्या. माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष शरद लेंडे, बाजार समिती सभापती संजय काळे, सुप्रिया लेंडे, पांडुरंग पवार, श्याम माळी, भानुदास लेंडे, रघुनाथ लेंडे, सोमनाथ माळी, गुलाब नेहरकर, विनायक तांबे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाबळ येथील कराटे स्पर्धेत आर्वीकेंद्र शाळेचे घवघवीत यश

■ नारायणगाव (दै. संध्या)

सेन्साई मास्टर नंदकुमार गावडे सर यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त पाबळ येथे भव्य कराटे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आर्वीकेंद्रच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या यशात मानाचा तुरा रोवला.

लाठीकाठी स्पर्धेत शौर्य भाग्यश्री स्वप्निल खेबडे आणि अनन्या नीता प्रवीण डोंगरे यांनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. या दोन्ही विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल प्रदान करण्यात आले. तसेच प्रज्योत नीता नवनाथ गाढवे याने स्किपिंग स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत सिल्वर मेडल मिळविले.

या तिन्ही विद्यार्थ्यांची विभागीय पातळीवरील पुढील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या यशाबद्दल जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आर्वीकेंद्राच्या शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले. तसेच गुंजाळवाडी केंद्राच्या केंद्रप्रमुख आदरणीय सौ. शोभा डोंगरे मॅडम यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या प्रसंगी विद्यार्थ्यांचे पालक प्रवीण डोंगरे, भाग्यश्री खेबडे, नवनाथ गाढवे उपस्थित होते.

लाठीकाठी व स्किपिंग स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना कराटे कोच गणेश गुळवे सर, कविता गुळवे मॅडम, शाळेच्या मुख्याध्यापिका भारती आल्हाट मॅडम व उपशिक्षक कनिंगध्वज सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

